। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ८६ वा । सोमवार, दिनांक ०८ जून २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

**परंडा (प्रतिनिधी)–** पोलीस ठाणे अंतर्गत वय ६५वर्षे, रा. हेदरअली रोड परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.०५.०६.२०२६ रोजी दाउद यांचे घरी परंडा येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ तंबाखु, पान मसाला, खर्रा मावा असा एकुण ७८,७५५ किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला अन्न सुरक्षा अधिकारी अन्न व औषध प्रशासन म.राज्य धाराशिव चे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम–१२३,२२३, २७४, २७५ सह कलम २६(२)(आय.व्ही), २७(३)(डी), २७(३)(ई) कलम ३०(२)(अ), ५९ अन्नसुरक्षा व मानके कायदा अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर दोघावर गुन्हा दाखल

**धाराशिव (प्रतिनिधी)–** लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, आयशर टॅम्पो चा चालक व इतर दोन इसम यांनी दि. ०५.०६.२०२६ रोजी सालेगाव येथे दक्षिण ते सालेगाव उत्तर जाणारे रोडवर भिमनगर जवळ वाहन मध्ये गोवंशीय जातीच्या चार बैल क्रुरपणे भरुन त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना लोहारा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(डी) (ई) (एच) सह मपोका कलम ११९ सह भा.न्या.सं. कलम ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

तसेच दुसऱ्या एका घटनेत उमरगा पोलीस ठाणे अंतर्गत बाबा रा. कार्ले प्लॉट उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि. ०५.०६.२०२६ रोजी कार्ले प्लॉट उमरगा येथे गोवंशीय जनावराचे मांस ४० किलो मांस एकुण ८,००० बेकायदेशीर रित्या विक्री करत असताना उमरगा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द कलम ५(क), ९(अ) महा. प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सोलार प्लेटाची चोरी

**ढोकी (प्रतिनिधी)–** पोलीस ठाणे अंतर्गत दि.१४.०५.२०२६ रोजी सोलार प्लॅन्टवरील फिट करण्यासाठी आणुन ठेवलेल्या २४० बॉक्समधील १८ सोलार प्लेट असा एकुण १,३८,२७६ किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे–सोपान वाघ यांनी दि.०४.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## राज्यात मानसिक आरोग्य सेवांचे जाळे अधिक मजबूत करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधी** :राज्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागांपर्यंत मानसिक आरोग्य सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये 'उडान' प्रकल्पांतर्गत मानसिक आरोग्य सेवा अधिक बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने सार्वजनिक आरोग्य विभाग आणि दोन स्वयंसेवी संस्थांमध्ये पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यास मंजुरी दिली आहे.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार, ग्रामीण आदिवासी समाज विकास संस्था, सौसर (मध्य प्रदेश) आणि अन्यथा फाउंडेशन या संस्थांच्या सहकार्याने जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. हा करार १ ऑगस्ट २०२६ ते ३१ जुलै २०३१ या कालावधीसाठी लागू राहणार असून, तो पूर्णपणे गैरवित्तीय स्वरूपाचा असल्याने राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

राज्यात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत्या प्रमाणात समोर येत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि मेंदू विज्ञान संस्थेच्या सर्वेक्षणानुसार देशातील सुमारे १० ते १४ टक्के प्रौढ व्यक्तींना मानसिक आरोग्याचे विकार आहेत. महाराष्ट्राची लोकसंख्या लक्षात घेता सुमारे १.२ ते १.८ कोटी नागरिक मानसिक समस्यांशी झुंज देत असल्याचे या सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देत मानसिक आरोग्याला प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा अधिक परिणामकारकपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी 'उडान' प्रकल्पाचा विस्तार करण्यात येत आहे.

या प्रकल्पांतर्गत गावपातळीवर मानसिक आरोग्य जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून ग्रामपंचायत, बचत गट, युवक गट यांचा सहभाग वाढविला जाणार आहे; तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, मनुष्यबळ प्रशिक्षण, मातृ मानसिक आरोग्य कार्यक्रम राबविणे, तसेच सौम्य आणि मध्यम स्वरूपाच्या रुग्णांना मानसोपचार व समुपदेशन सेवा देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

याआधी नागपूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या 'उडान' प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर आता वर्धा जिल्ह्यातही हा कार्यक्रम विस्तारित करण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांना मानसिक आरोग्य उपचार आणि समुपदेशन सेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने या करारासाठी आरोग्य सेवा संचालकांना अधिकृत केले असून, मानसिक आरोग्य क्षेत्रात शासन आणि स्वयंसेवी संस्थांमधील समन्वयातून राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न आहे.

## पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर १३ पाटबंधारे प्रकल्पांतील पाणीसाठा पिण्यासाठी राखीव

**धाराशिव/जिमाका :** संभाव्य अल निनो परिस्थितीमुळे यंदाचा पर्जन्यमान लांबण्याची शक्यता व भविष्यात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव,कळंब,भूम, वाशी आणि परंडा तालुक्यातील १३ पाटबंधारे प्रकल्पांमधील उपलब्ध पाणीसाठा पुढील आदेशापर्यंत पिण्याच्या वापरासाठी राखीव ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी जारी केले आहेत.

कार्यकारी अभियंता,धाराशिव पाटबंधारे विभाग क्रमांक १ यांच्या अहवालानुसार,एल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून संबंधित प्रकल्पांतील उपलब्ध पाणीसाठा नागरिकांच्या पिण्याच्या गरजांसाठी सुरक्षित ठेवणे आवश्यक असल्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

आदेशानुसार धाराशिव तालुक्यातील अंबेहोळ साठवण तलाव प्रकल्प, उपळा साठवण तलाव क्रमांक १, उपळा साठवण तलाव क्रमांक ३ आणि शेकापूर साठवण तलाव प्रकल्प,कळंब तालुक्यातील कोठेवाडी लघु पाटबंधारे प्रकल्प आणि चोराखळी साठवण तलाव प्रकल्प,भूम तालुक्यातील नांदगाव साठवण तलाव प्रकल्प, बारगाव प्रकल्प आणि जांब लघु पाटबंधारे प्रकल्प,वाशी तालुक्यातील बोरगाव बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प आणि ई-याचीवाडी लघु पाटबंधारे प्रकल्प, तसेच परंडा तालुक्यातील वाटेफळ साठवण तलाव प्रकल्प आणि साकत मध्यम प्रकल्प यांतील उपलब्ध पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की,संबंधित प्रकल्पांमध्ये सध्या समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध नसल्याने या जलस्रोतांमधून अवैध पाणी उपसा होणार नाही यासाठी विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अवैध पाणी उपसा तातडीने बंद करून उपलब्ध पाणीसाठा केवळ पिण्याच्या वापरासाठी जतन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याशिवाय परिसरातील जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही विचार करून संबंधित प्रकल्पांतील उपलब्ध पाणी राखीव ठेवण्यावर भर देण्यात आला आहे.उपलब्ध जलसाठा अधिकाधिक काळ टिकून राहावा आणि नागरिकांना दीर्घकाळ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याची गरज प्रशासनाने व्यक्त केली आहे.

## १०६ विद्यार्थ्यांनी नर्सिंग कॉलेजात सेवेची शपथ घेतली

**धाराशिव/प्रतिनिधरी:** धाराशिव आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचालित के. टी. पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, धाराशिव येथे बी.एस्सी. नर्सिंग (१६ वी बॅच) तसेच जी.एन.एम. व ए.एन.एम. (१५ वी बॅच) विद्यार्थ्यांचा दीपप्रज्वलन व शपथविधी समारंभ उत्साहात संपन्न झाला. हा कार्यक्रम हातलाई फंक्शन हॉल अँड लॉन्स येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव प्रेमाताई पाटील होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. तानाजी लाकाळ (वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव तसेच अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय) उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून सचिन कवळे (सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग) यांनी मार्गदर्शन केले. मान्यवर अतिथी म्हणून सुमित्रा गोरे (मेट्रन, सामान्य रुग्णालय) व पल्लवी चव्हाण (मेट्रन, महिला रुग्णालय) उपस्थित होत्या. यावेळी डॉ. मंजुळा पाटील, अभिराम सुधीर पाटील (चेअरमन, हातलाई शुगर्स प्रा. लि.), डॉ. तनया पाटील तसेच संचालक संतोष कुलकर्णी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी एकूण १०६ विद्यार्थ्यांनी सेवा, करुणा व व्यावसायिक नैतिकतेची शपथ घेतली. विशेष अतिथी सचिन कवळे यांनी नर्सिंग हे मानवसेवेचे श्रेष्ठ माध्यम असल्याचे सांगत समाज कल्याण व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्तींबाबत संक्षिप्त मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. प्राचार्य डॉ. गजानंद आर. वाले यांनी संस्थेचा वार्षिक अहवाल, प्रगती तसेच विद्यार्थ्यांची शासकीय व निमशासकीय सेवांमधील नियुक्ती याबाबत माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शैक्षणिक समन्वयक जे. एस. कोळी, राहुल बनकर व इतर शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक तृप्ती माने यांनी केले. या वेळी विद्यार्थी उपस्थित होते.

## धाराशिवच्या मुळेवाडीत मराठवाड्यातील पहिली गावराण बियाणे बँक

**धाराशिव/प्रतिनिधी:** धाराशिव तालुक्यातील मुळेवाडी येथे गावराण बियाणे संवर्धन प्रकल्पांतर्गत मराठवाड्यातील पहिली गावराण बियाणे बँक उभारण्यात आली असून हरभऱ्याच्या तब्बल ६१ आणि ज्वारीच्या १६ स्थानिक जातींची प्रात्यक्षिक लागवड करण्यात आली आहे. स्थानिक बीजवैविध्याचे संवर्धन आणि शाश्वत शेतीला चालना देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

बीएएसएफच्या अर्थसाहाय्याने आणि यूएनजीसी-बायफच्या संयुक्त अमलबजावणीत हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. शेतकरी अशोक मुळे आणि विक्रम मुळे यांच्या शेतात विविध गावराण वाणांची प्रात्यक्षिक लागवड करून प्रकल्पाचा पहिला टप्पा यशस्वीपणे पूर्ण करण्यात आला. स्थानिक वाणांचे जतन, पुनरुज्जीवन आणि पुढील पिढीसाठी सुरक्षित साठवण ही या उपक्रमामागील प्रमुख संकल्पना आहे. गेल्या काही वर्षांत संकरित आणि व्यापारी वाणांचा वाढता वापर, हवामान बदल आणि शेतीचा वाढता खर्च यामुळे अनेक पारंपरिक वाण नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या पार्श्वभूमीवर हरवू लागलेल्या वाणांचा शोध, संकलन, संवर्धन आणि शेतकऱ्यांपर्यंत पुनर्प्रसार करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

प्रात्यक्षिक शेतांमध्ये प्रत्येक वाणाची स्वतंत्र ओळीत वैज्ञानिक पद्धतीने लागवड करण्यात आली. त्यामुळे विविध वाणांची वाढ, उत्पादनक्षमता, रोगप्रतिकारकता आणि स्थानिक हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता अभ्यासणे शक्य होत आहे. बायफचे क्षेत्रीय अधिकारी लिलेश चव्हाण यांनी शेतकऱ्यांना बीजशुद्धीकरण, सेंद्रिय तंत्रज्ञान, रोग-किड व्यवस्थापन आणि बियाणे साठवण याबाबत मार्गदर्शन केले. धाराशिव तालुक्यातील १० गावांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत असून मुळेवाडी व कसबे तडवळे येथे दोन स्वतंत्र बियाणे बँका उभारण्यात आल्या आहेत. यामुळे स्थानिक बीजसाखळी मजबूत होऊन शेतकऱ्यांचे स्वावलंबन आणि टिकाऊ शेतीला नवी दिशा मिळणार आहे.

स्थानिक वाणांच्या पुनरुज्जीवनावर भर गावराण बियाणे संवर्धन प्रकल्पाचा मुख्य उद्देश हरवू लागलेल्या स्थानिक वाणांचे जतन आणि पुनरुज्जीवन हा आहे. कमी खर्चिक, हवामानाशी सुसंगत आणि रोगप्रतिकारक वाणांचे संवर्धन करून जैवविविधता टिकविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. स्थानिक शेती पद्धतींना बळकटी देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे.

## जागतिक पर्यावरण दिन : जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे वृक्षारोपण व निसर्ग संवर्धनाचा संदेश

**धाराशिव /जिमाका:** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद यांच्या वतीने आज ५ जून,२०२६ रोजी न्यायिक अधिकारी निवासस्थान परिसर,धाराशिव येथे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अभिश्री देव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

दरवर्षी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत विविध सामाजिक व पर्यावरणपूरक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.याच परंपरेला अनुसरून या वर्षीही भव्य वृक्षारोपण मोहीम राबवून विविध झाडे लावण्यात आली.तसेच उपस्थितांना व नागरिकांना मानवी जीवनातील झाडांचे महत्त्व आणि निसर्ग संवर्धनाची गरज याविषयी सविस्तर माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती.अभिश्री देव यांच्या हस्ते रोपटे लावून करण्यात आली.या प्रसंगी श्री.ए.एस.आवटे,जिल्हा न्यायाधीश श्री.आर.के. खोमणे,जिल्हा न्यायाधीश,श्री.एन.एल.येवलेकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश उस्मानाबाद,श्री.विश्वास करे, विभागीय वन अधिकारी,धाराशिव, श्रीमती.भाग्यश्री पाटील,सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद,श्री.दिपक गांधले,वन परीक्षेत्र अधिकारी,धाराशिव, श्रीमती. पी.व्ही.मेढे,मुख्य न्यायदंडाधिकारी,उस्मानाबाद, श्री.एस.एस.पाटील,सहदिवाणी न्यायाधीश व वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद,तसेच श्री.एस. एस. पाटील,७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,उस्मानाबाद यांची प्रमुख उपस्थिती होती.

वृक्षारोपण कार्यक्रमात जिल्हा न्यायालयातील कर्मचारी,विद्युत आणि वन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.सर्वांनी मिळून पर्यावरण रक्षणाची शपथ घेतली तसेच लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याचा संकल्प केला.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## निरोगी जीवनाची गरज

जीवन निरोगी जगणे याला महत्व आहे. मात्र नुकतेच एसएसओ सर्वेक्षणानुसार, भारतात संसर्गजन्य आजाराऐवजी जीवनशैलीशी संबंधित आजारपणाने गंभीर रूप धारण केले आहे. प्रामुख्याने हृदयाशी संबंधित आजारपण, मेटाबॉलिक समस्या म्हणजेच मधुमेह, हार्मोनल असंतुलन यासारखे आजार एकूण आजारांच्या तुलनेत निम्मा सहभाग नोंदवत आहेत. अर्थात हा बदल दहा वर्षांतील आहे म्हणून आरोग्य तज्ज्ञ याकडे नवीन आरोग्य संकट म्हणून पाहत आहेत. सर्वेक्षणाचे आकलन केल्यास देशातील आता प्रत्येक आठवी व्यक्ती कोणत्या ना कोणत्या आजाराने पीडित असल्याचे लक्षात येते. २०२५ मध्ये १३.१ टक्के नागरिकांनी सर्वेक्षणाच्या काळात मागील पंधरा दिवसांत कोणता ना कोणता त्रास झाल्याची माहिती दिली. हे प्रमाण २०१७-१८च्या तुलनेत दुप्पट आहे. हा आकडा केवळ गंभीर आजारांपुरताच मर्यादित नाही तर तो ढासळत्या आरोग्याचे चित्र मांडत आहे. तसेच नागरिकांना एकाचवेळी अनेक आजारांचा सामना करावा लागत आहे. हा अहवाल देशभरातील १.४ लाख कुटुंबांवर आधारित आहे. यात ग्रामीण आणि शहरी या दोन्ही घटकांना सामील केले आहे. व्यापक प्रमाणात केलेल्या सर्वेक्षणातून समोर आलेले चित्र आरोग्य व्यवस्था, जीवनशैली यातील होणारा बदल सांगत आहे. अहवालानुसार, आजारपणाचा पॅटर्न वयोमानानुसार बदलत आहे. मुलांमध्ये अजूनही संसर्गजन्य आजारांचे प्रमाण अधिक आहे. त्याचवेळी तरुणांमध्ये जीवनशैलीशी संबंधित आजारपण वाढत आहे. ज्येष्ठांत ही स्थिती आणखीच गंभीर होताना दिसून येते. यास बऱ्याच काळापासून असणारे आजार कारणीभूत असतात. परिणामी आरोग्य विम्यात वाढ झाली आहे. ग्रामीण भागात सुमारे ४७ टक्के आणि शहरी भागात सुमारे ४४ टक्के लोकसंख्या कोणत्या ना कोणत्या विमा योजनेशी जोडलेली आहे. तरीही उपचारापोटी बराच पैसा नागरिकांना स्वतःच्या खिशातून खर्च करावा लागत आहे. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर होणारा खर्च अजूनही अनेकांसाठी मोठे आर्थिक आव्हान ठरत आहे. प्रामुख्याने हृदयविकार, मूत्रपिंड विकार यासारख्या गंभीर आजारपणात तर कुटुंबांची आर्थिक स्थिती काहीवेळा बिकट झाल्याचे दिसून येते. अहवालात म्हटल्यानुसार, काही प्रकरणात गंभीर आजारापोटी जादा खर्च होत असल्याने सरासरी खर्चात वाढ होते. परिणामी हृदयविकाराच्या आजारपणामुळे संबंधित कुटुंबावर पडणारा आर्थिक भार हा अडचणीत आणणारा ठरतो. आजारपणाच्या बदलत्या स्वरूपामुळे आणि वाढत्या संख्येमुळे आरोग्य प्रणालीसमोर नवीन आव्हाने उभी राहात आहेत. जानेवारी ते डिसेंबर २०२५ या काळातील 'हाउसहोल्ड सोशल कंझम्प्शन हेल्थ सर्वेक्षणा'चे आकलन केल्यास सुमारे १३.१ टक्के भारतीयांनी मागील पंधरा दिवसांत कोणत्या ना कोणत्या आजाराची तक्रार केली असल्याचे निदर्शनास येते. प्रत्येकी एक लाख लोकसंख्येमागे १५,२१७ तक्रारी नोंदविल्या असून त्यावरून अनेक जण एकाचवेळी अनेक आजारांचा सामना करत असल्याचे ध्यानात येते. सर्वेक्षणानुसार महिलातील आजारपणाचे प्रमाण (१७,००६ प्रति लाख) पुरुषांच्या (१३,५०४ प्रति लाख) तुलनेत अधिक आहे; परंतु हृदयाशी संबंधित आजारपणामुळे रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांत पुरुषांचे प्रमाण अधिक आहे, विशेषतः शहरी भागात. अहवालातील माहितीनुसार, हृदयाशी संबंधित आजारपण आता देशातील एकूण आजारांत २५.६ टक्के वाटा नोंदवत आहे आणि हे प्रमाण अन्य आजारांच्या तुलनेत अधिक आहे. यात उच्च रक्तदाब, हृदयविकार, छातीत दुखणे, श्वास घेण्यास त्रास होणे यासारख्या लक्षणांचा समावेश आहे. प्रति एक लाख लोकसंख्येमागे ३३५८ नागरिक उच्च रक्तदाबाने पीडित आहेत. त्याचवेळी अन्य हृदयविकार असलेल्या रुग्णांची संख्या ५३३ राहिली आहे. हृदयाशी संबंधित आजारपण वयोमानानुसार वाढत जाते. शून्य ते चौदा वयोगटातील मुलांचे प्रमाण नगण्य असताना १५ ते २९ वयोगटातील मुलांत हे प्रमाण २.१ टक्क्यांवर पोहोचले आहे. ३० ते ४४ वयोगटात हा आकडा १५.२ टक्के, ४५ ते ५९ वयोगटात ४०.१ टक्के आणि ६० पेक्षा अधिक वयोगटात हे प्रमाण ३७.८ टक्क्यांवर पोहोचले आहे. हा ट्रेंड पाहता हृदयाशी संबंधित आजारपणाने धारण केलेले गंभीर रूप लक्षात येते. हृदयविकारामुळे रुग्णालयात दाखल होणाऱ्यांची संख्या वाढली आहे. १५ ते २९ वयोगटातील ३.४ टक्के तरुण हृदयविकारामुळे रुग्णालयात दाखल झाले आहेत. ३० ते ४४ वयोगटात ७.३ टक्के, ४५ ते ५९ वयोगटातील १३.९ टक्के आणि ६० पेक्षा अधिक वयोगटातील लोकांचे प्रमाण १८.२ टक्क्यांवर पोहोचले आहे. २०१७-१८ पासून ते २०२५ या काळात आरोग्यविषयक मोठा बदल पाहावयास मिळाला आहे. एकीकडे संसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी होत ते २५४७ वरून २३०२ प्रती लाख पोचलेले असताना हृदयविकाराशी संबंधित आजारी लोकांची संख्या १३३३ वरून ३८९१ वर पोहोचली आहे. हा बदल चुकीची जीवनशैली, वाढता तणाव आणि शारीरिक हालचालीत होणारी घट सांगणारा आहे. शहरी भागात हृदयाशी संबंधित उद्भवणाऱ्या आजारपणामुळे रुग्णालयात दाखल होण्याचे प्रमाण ग्रामीण भागाच्या तुलनेत अधिक आहे. शहरातील हे प्रमाण एकूण ११.९ टक्के असताना ग्रामीण भागात हे प्रमाण १०.३ टक्के आहे. यावरून शहरी जीवनशैली मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम करत असल्याचे दिसते. तणाव, फास्टफूड, व्यायामाचा अभाव आदी गोष्टी हृदयविकाराला चालना देत आहेत. हृदयाशी संबंधित होणारे उपचार देखील महागडे आहेत. शहरी भागात त्याच्या उपचारापोटी येणारा सरासरी खर्च ६९,४५१ रुपये असून तो अन्य संसर्गजन्य, मधुमेह आणि श्वासाशी संबंधित आजाराच्या तुलनेत अधिक आहे. ग्रामीण भागात हा खर्च सरासरी ४७,१३५ रुपये असून ते सर्वसामान्य कुटुंबासाठी मोठे आर्थिक ओझे ठरू शकते. अर्थात कर्करोग, मूत्रपिंड निकामी होणे आणि मस्कुलोस्केलेटल सारखे आजार चिंताजनक आणि खूपच खर्चिक आहेत. तरीही हृदयाशी संबंधित आजारपणाची वाढती व्याप्ती आणि रुग्णांची संख्या चिंताजनक आहे. या अहवालाचा अभ्यास केल्यास भारत हा सध्या 'कार्डिओव्हॅस्कुलर क्रायसिस'च्या उंबरठ्यावर उभा असल्याचे म्हणावे लागेल. जीवनशैली, खानपान, नियमित तपासणी याकडे वेळीच लक्ष दिले नाही तर आगामी काळात ही समस्या आणखी गंभीर रूप धारण करू शकते. देशाची खरी ताकद ही निरोगी, सदृढ जनता आहे.

# मांजर बोलू शकत नाही, पण शरीरातून देते आजाराचे संकेत; जाणून घ्या कोणते



घरात पाळलेली मांजर आपल्या भावना किंवा त्रास शब्दांत सांगू शकत नाही. मात्र तिच्या वागण्यात आणि शरीरात दिसणारे बदल अनेकदा तिच्या आरोग्याविषयी महत्त्वाचे संकेत देत असतात. त्यामुळे मांजरीच्या सवयी, हालचाली आणि शारीरिक स्थितीवर लक्ष ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

जर तुमच्या पाळीव मांजरीची नखे पिवळी पडू लागली असतील, फर (केस) नेहमीपेक्षा जास्त गळत असेल किंवा त्वचेत काही असामान्य बदल दिसत असतील, तर या गोष्टींकडे दुर्लक्ष करू नका. हे काही गंभीर आरोग्य समस्यांचे संकेत असू शकतात.

**केस जास्त प्रमाणात गळणे**

मांजरीचे केस गळणे ही काही प्रमाणात सामान्य बाब असली तरी अचानक जास्त प्रमाणात केस गळू लागणे किंवा शरीरावर टक्कल पडल्यासारखे भाग दिसू लागणे चिंतेचे कारण ठरू शकते. यामागे ॲलर्जी, बुरशीजन्य संसर्ग, त्वचेवरील परजीवी, हार्मोन्समधील असंतुलन किंवा पोषणाची कमतरता असू शकते.

तज्ज्ञांच्या मते, केस गळणे हा स्वतः एक आजार नसून शरीरातील इतर समस्यांचे लक्षण असू शकते. त्यामुळे अशी समस्या दिसल्यास पशुवैद्यकांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

**नखांचा रंग पिवळा होणे**

मांजरीची नखे, हिरड्या किंवा त्वचा पिवळसर दिसू लागल्यास ते कावीळ किंवा यकृताशी संबंधित समस्येचे संकेत असू शकतात. शरीरातील बिलीरुबिनचे प्रमाण वाढल्याने हा बदल दिसून येतो.

यकृत, पित्ताशय किंवा रक्ताशी संबंधित काही गंभीर आजारांमध्येही अशी लक्षणे आढळू शकतात. त्यामुळे नखांचा किंवा त्वचेचा रंग बदलल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये.

**सतत खाजवणे किंवा शरीर चाटणे**

मांजर वारंवार स्वतःचे शरीर चाटत असेल किंवा सतत खाजवत असेल, तर ते त्वचेच्या आजाराचे लक्षण असू शकते. ॲलर्जी, परजीवी संसर्ग, त्वचेची जळजळ किंवा वेदना यामुळेही मांजर असे वर्तन करू शकते.

अतिप्रमाणात शरीर चाटल्यामुळे केस गळण्याची समस्या वाढू शकते. त्यामुळे अशा बदलांकडे वेळेत लक्ष देणे गरजेचे आहे.

**त्वचेवर लालसरपणा किंवा खवले**

मांजरीच्या त्वचेवर लाल चट्टे, सूज, कोरडेपणा किंवा खवले दिसत असल्यास ते त्वचारोगाचे संकेत असू शकतात. बुरशीजन्य किंवा जीवाणूजन्य संसर्गामुळेही अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

त्वचेतील बदल दीर्घकाळ टिकून राहिल्यास त्वरित वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे.

**नखे तुटणे किंवा संसर्ग होणे**

नखांच्या आसपास सूज येणे, नखे तुटणे किंवा त्याठिकाणी संसर्ग दिसणे हे 'रिंगवर्म'सारख्या बुरशीजन्य संसर्गाचे लक्षण असू शकते. या संसर्गामध्ये केस गळणे, त्वचेचा रंग बदलणे आणि नखांमध्ये बदल दिसून येतात.

अशा प्रकारची लक्षणे दिसल्यास घरातील इतर पाळीव प्राण्यांनाही संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे तातडीने उपचार करणे महत्त्वाचे ठरते.

वेळेत ओळखा, मांजरीचे आरोग्य जपा

पाळीव मांजरीच्या आरोग्यासाठी तिच्या शरीरातील आणि वागणुकीतील बदलांकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. केस गळणे, नखे पिवळी पडणे, त्वचेवर खवले येणे किंवा सतत खाजवणे यांसारखी लक्षणे दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नका. वेळेत निदान आणि योग्य उपचार केल्यास अनेक गंभीर आजारांपासून मांजरीचे संरक्षण करता येऊ शकते.

# सकाळी रिकाम्या पोटी तूप खाण्याबाबत ऐकले आहे का?



भारतीय स्वयंपाकघरात तूपाला विशेष महत्त्व आहे. अन्नाची चव वाढवण्याबरोबरच तूप आरोग्यासाठीही फायदेशीर मानले जाते. आयुर्वेदात तूप हे पौष्टिक घटकांनी समृद्ध असे अन्न मानले जाते. गेल्या काही वर्षांत सकाळी रिकाम्या पोटी एक चमचा तूप खाण्याची सवय अनेकांमध्ये लोकप्रिय झाली आहे. अनेक तज्ज्ञ आणि आरोग्यप्रेमी याचे विविध फायदे सांगतात.

तूपामध्ये निरोगी चरबी, जीवनसत्त्वे आणि शरीराला आवश्यक असलेले अनेक पोषक घटक आढळतात. त्यामुळे योग्य प्रमाणात तूप सेवन केल्यास शरीराला अनेक प्रकारचे फायदे मिळू शकतात. मात्र कोणताही आरोग्यविषयक बदल करण्यापूर्वी वैद्यकीय सल्ला घेणेही महत्त्वाचे आहे.

**हाडांच्या आरोग्यासाठी उपयुक्त**

तूपामध्ये जीवनसत्त्व घ सारखे घटक आढळतात, जे शरीरातील कॅल्शियमचे शोषण सुधारण्यास मदत करतात. त्यामुळे हाडे मजबूत राहण्यास मदत होऊ शकते. वाढते वय, चुकीचा आहार आणि व्यायामाचा अभाव यामुळे अनेकांना हाडांच्या समस्या जाणवतात. अशा परिस्थितीत संतुलित आहारासोबत योग्य प्रमाणात तूप सेवन करणे लाभदायक ठरू शकते. काही तज्ज्ञांच्या मते, यामुळे सांधेदुखी आणि कंबरदुखीच्या तक्रारी कमी होण्यासही मदत मिळू शकते.

**त्वचेसाठी फायदेशीर**

सकाळी रिकाम्या पोटी तूप खाल्ल्याने त्वचेचे आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकते. तूपामध्ये असलेले पोषक घटक त्वचेला आतून पोषण देतात. त्यामुळे त्वचेवर नैसर्गिक चमक येण्यास मदत मिळते. अनेकजण त्वचा निरोगी आणि तजेलदार ठेवण्यासाठी तूपाचा आहारात समावेश करतात.

# वयाच्या ५० नंतर उन्हाळ्यात घ्या स्वत:ची काळजी

उन्हाळ्याच्या दिवसांत तापमानाचा पारा झपाट्याने वाढत असून त्याचा सर्वाधिक परिणाम ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. वय वाढत असताना शरीराची तापमान नियंत्रित करण्याची क्षमता कमी होत जाते. त्यामुळे डिहायड्रेशन, उष्माघात, चक्कर येणे, रक्तदाबातील चढ-उतार यांसारख्या समस्या उद्भवण्याचा धोका वाढतो.

विशेषतः ५० वर्षांवरील व्यक्तींनी या काळात आहार, पाण्याचे सेवन, दैनंदिन सवयी आणि औषधोपचार याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. त्यामुळे ५० नंतर उन्हाळ्यात निरोगी राहण्यासाठी आणि उष्णतेपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी, हे जाणून घेऊया.

**१. खाण्यापिण्याच्या सवयी**

**नियमित पाणी पिणे:**

तहान लागली नसली तरीही दिवसातून किमान ८-१० ग्लास पाणी प्या. वृद्ध व्यक्तींमध्ये तहान लागण्याची जाणीव कमी होते, त्यामुळे पाण्याची बाटली सोबत ठेवा.

**ताक आणि शहाळे:**

ताजे ताक, शहाळ्याचे पाणी आणि कोकम सरबत यांसारखी नैसर्गिक पेये शरीराला थंड ठेवतात.

**प्रथिने आणि हलका आहार:**

पचायला जड असलेले अन्न (उदा. तळलेले पदार्थ) टाळा. वरण-भात, मुगाची खिचडी, नाचणीचे सत्व यांसारखे हलके आणि पौष्टिक पदार्थ घ्या.

**२. ऊन आणि उष्णतेपासून संरक्षण**

**वेळेचे नियोजन:**

दुपारी १२ ते ४ या वेळेत बाहेर पडणे टाळा. जर काही महत्त्वाचे काम असेलच, तर सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा पूर्ण करा.

**पेहराव:**

सैल, फिकट रंगाचे आणि सुती कपडे वापरा. सुती कपड्यांमुळे घाम शोषला जातो आणि अंगाला पुरळ येत नाही.

**डोळ्यांची आणि डोक्याची काळजी:**

बाहेर जाताना छत्री, टोपी किंवा सुती रुमाल डोक्याला बांधा आणि चांगल्या दर्जाचे सनग्लासेस वापरा.

**३. शारीरिक आणि मानसिक आरोग्य**

**थंड पाण्याने स्नान:**

शरीराचे तापमान कमी ठेवण्यासाठी दिवसातून दोनदा कोमट किंवा साध्या पाण्याने आंघोळ करा.

प्राणायाम आणि योगासने:

सकाळी लवकर मोकळ्या हवेत प्राणायाम किंवा हलके योगासने करा. यामुळे रक्ताभिसरण चांगले राहते आणि उष्णतेचा ताण जाणवत नाही.

**पुरेशी झोप:**

उष्णतेमुळे थकवा जाणवू शकतो, त्यामुळे दुपारच्या वेळी थोडी विश्रांती आणि रात्री किमान ७-८ तासांची शांत झोप घ्या.

**४. वैद्यकीय पथ्ये**

**नियमित तपासणी:**

वय वर्ष ५० नंतर मधुमेह किंवा रक्तदाब यांसारखे त्रास असल्यास उन्हाळ्यात त्यांचे प्रमाण तपासत राहा.

**औषधांचे नियोजन:**

औषधे वेळेवर घ्या. काही औषधांमुळे लघवीचे प्रमाण वाढते, अशा वेळी डिहायड्रेशन होणार नाही याची काळजी घ्या.

**५. धोक्याची चिन्हे ओळखा**

जर खालीलपैकी कोणतीही लक्षणे जाणवली, तर घरगुती उपाय करण्याऐवजी त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या:

- **तीव्र डोकेदुखी किंवा चक्कर येणे.**
- **अतिशय कोरडी त्वचा आणि घाम न येणे.**
- **मळमळ होणे किंवा उलट्या होणे.**
- **हृदयाचे ठोके वेगाने पडणे.**

उन्हाळ्यात घरात राहणे, खिडक्यांना पडदे लावणे आणि हवा खेळती ठेवणे या छोट्या गोष्टींमुळेही मोठा आराम मिळू शकतो.

# महापारेषणचा २१ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

## – सुनियोजन करून अंमलबजावणी केल्यास प्रकल्प वेळेत पूर्ण : डॉ. संजीव कुमार

## व्हर्च्युअल सोहळ्यामुळे १ कोटींची बचत; राज्यस्तरीय पारितोषिकांचे वितरण

मुंबई/प्रतिनिधी : महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी २० वर्षात चांगले काम केले आहे. पण, आता ऊर्जा संक्रमणामध्ये राईट ऑफ वे, हवामान बदल आणि अक्षय ऊर्जेसाठी काम करावे लागणार आहे. यासाठी अधिकाऱ्यांनी सुनियोजन करून अंमलबजावणी केल्यास प्रकल्प वेळेत पूर्ण होतील.ऋऋ, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे (महापारेषण) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी केले.





वांद्रे येथील प्रकाशगंगा इमारतीत महापारेषणचा २१ वा वर्धापनदिन दूरदृश्य प्रणालीव्दारे उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात डॉ. संजीव कुमार बोलत होते. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. दत्तात्रय पडळकर, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, कार्यकारी संचालक (राज्य भार प्रेषण केंद्र) श्री. शशांक जेवळीकर, अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने उपस्थित होते.

सुरूवातीला मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांनी महापारेषणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिलेल्या शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले.

वर्धापनदिनाच्या शुभेच्छा देऊन तसेच विजेत्यांचे अभिनंदन करून डॉ. संजीव कुमार म्हणाले, महापारेषणचे राज्यात चांगले काम सुरू आहे. तांत्रिक मुद्द्यापेक्षा राईट ऑफ वे मुळे प्रकल्प प्रलंबित राहत आहेत. त्यासाठी अधिकाऱ्यांनी सर्वांशी संवाद वाढविला पाहिजे. विशेतः प्रकल्पांच्या कामात सुनियोजन केल्यास प्रकल्प वेळेत पूर्ण होतील. कळवा-पडघे वीजवाहिनीच्या कामाची अंमलबजावणी जशी झाली, त्याप्रमाणे सर्व प्रकल्पात सुसंवाद वाढविला पाहिजे.

अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने म्हणाल्या, महापारेषणचा वर्धापनदिन हा सकारात्मक प्रवासाचा उत्सव आहे. मानव संसाधन विभागाने बढती, परीक्षांचे निकाल वेळेत लावून सुमारे चार हजार उमेदवारांची नोकरभरती केली. वार्षिक आरोग्य तपासणी, सैनिकांचे प्रश्न मार्गी लावले. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या योग आणि प्राणायमसाठी आर्ट ऑफ लिव्हिंगसोबत करार केला आहे. सांघिक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधीतून अनेक शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य, पर्यावरण आणि अक्षय ऊर्जेसाठी भरीव काम केले आहे. इको फ्रेंडली आणि सेंद्रीय पदार्थांचा वापर वाढविला पाहिजे. विकसित भारत-२०४७ साठी सर्वांनी पुढाकार घ्यावा.

यावेळी संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. दत्तात्रय पडळकर, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, कार्यकारी संचालक (राज्य भार प्रेषण केंद्र) श्री. शशांक जेवळीकर यांचीही भाषणे झाली.

ऊन-पावसाची तमा न बाळगता विशेष कामगिरी केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पारितोषिके घोषित करून गौरविण्यात आले. या सोहळ्याला राज्यातील विविध परिमंडलातील सुमारे साडेपाच हजार अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय दूरदृश्य प्रणालीव्दारे व ऑनलाईन उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. महेश आंबेकर यांनी केले तर आभार श्री. राजू गायकवाड यांनी मानले.

**व्हर्च्युअल सोहळ्यामुळे १ कोटींची बचत**

महापारेषणचा वर्धापनदिन आणि राज्यस्तरीय पारितोषिक वितरण सोहळा पारंपरिक पद्धतीने साजरा केल्यास सुमारे एक कोटींचा खर्च अपेक्षित होता. मात्र, पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या 'अनावश्यक खर्च टाळा' या आवाहनाला प्रतिसाद देत यंदा हा कार्यक्रम पूर्णपणे दूरदृश्य प्रणालीद्वारे घेण्यात आला. त्यामुळे महापारेषणने तब्बल एक कोटींची बचत केली. तसेच ऊर्जा बचत आणि पर्यावरण संरक्षणासाठी कार्यालयांमधील अनावश्यक दिवे बंद ठेवणे आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिक वापर करण्याचे आवाहनही अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांनी केले.

**देशी आणि पर्यावरणपूरक सजावटीने 'प्रकाशगंगा'ला लाभले मंदिराचे स्वरूप**

महापारेषणच्या 'प्रकाशगंगा' मुख्यालयाची यंदा पारंपरिक, देशी आणि पर्यावरणपूरक पद्धतीने सजावट करण्यात आली. झेंडूच्या फुलांच्या माळा, आंब्याच्या पानांची तोरणे आणि केळीच्या पानांचा वापर करून करण्यात आलेल्या या सजावटीमुळे संपूर्ण परिसराला सात्त्विकता, पावित्र्य आणि भारतीय संस्कृतीची झलक प्राप्त झाली.

सजावटीप्रमाणेच भोजन व्यवस्थेतही साधेपणा आणि पर्यावरणपूरकतेला प्राधान्य देण्यात आले. अनावश्यक खर्च टाळत भोजनात केवळ तीन पदार्थांचा समावेश करण्यात आला. यामध्ये शेंगदाणा तेलात तयार केलेला पुलाव तसेच पारंपरिक देशी भाज्यांचा समावेश होता. स्थानिक आणि पौष्टिक अन्नपदार्थांना प्रोत्साहन देत आरोग्यदायी आहाराचा संदेश देण्यात आला. साधेपणा, बचत आणि पर्यावरण संवर्धन या त्रिसूत्रीचा अवलंब करून महापारेषणने वर्धापनदिन साजरा केल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# बिनविरोधचा पॅटर्न




उमेदवारी परस्पर मागे घेणार्या उमेदवारांवर काँग्रेसने कारवाईचा बडगा उचलला असून अर्ज मागे घेतलेल्या दोन उमेदवारांची पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पक्षातून हकालपट्टी केली आहे.

विधान परिषदेची निवडणूक येत्या १८ जून रोजी होत आहे; मात्र अर्ज माघारीच्या दिवशीच ही निवडणूक जवळजवळ एकतर्फी होणार असल्याचे चित्र दिसून आले. काही मतदारसंघांत महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांनी निवडणुकीच्या रणांगणातून पळ काढला. ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, यवतमाळ, छत्रपती संभाजीनगर, वर्धा-चंद्रपूर आणि अहिल्यानगर या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांत महाविकास आघाडीने उभे केलेल्या उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतल्याने प्रत्यक्ष निवडणुकीच्या आधीच या सहा जागा महायुतीने जिंकल्यासारख्याच आहेत. साम, दाम, दंड, भेद या धोरणाचा अवलंब करीत महायुतीने ही निवडणूक एकतर्फी होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केल्याचे दिसते. भाजपचे नेते आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तर महाविकास आघाडीने ही निवडणूक लढवूच नये अशीच अपेक्षा व्यक्त केली. स्थानिक स्वराज्य मतदार संघात महायुतीचे स्पष्ट संख्याबळ असल्याने महाविकास आघाडीने उमेदवारीबाबत फेरविचार करावा, लढत देण्याइतपत त्यांच्याकडे संख्याबळ नसल्याने निवडणूक बिनविरोध करण्याचा विचार करावा हे त्यांचे म्हणणे लोकशाहीच्या मूळ तत्त्वालाच नख लावणारे आहे. कोकणातील उमेदवारांच्या अर्ज माघारीसाठी भाजपचे मंत्री नीतेश राणे जातीने उपस्थित राहतात, यामागे दहशतीने ही माघार घ्यायला लावणे हेच कारण असण्याची शक्यता अधिक दिसते. शिवसेना ठाकरे गटाचे बाळ माने(कोकण), देवयानी डोणगावकर (संभाजी नगर) या अधिकृत उमेदवारांनी माघार घेतल्यानंतर त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. उमेदवारांनी परस्पर माघार घेतल्याने आघाडीतील बेबनावही उघड झाला आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या उमेदवाराने माघार घेतल्यानंतर काँग्रेसच्या शहराध्यक्षांनी राष्ट्रवादीवर विश्वासघात केल्याचा आरोप केला आहे, तर राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनीही उमेदवारी देताना मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप अजित पवार गटावर केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अनेक जण पहिल्यांदाच निवडून आले आहेत, अशा नवमतदारांचा मतदानाचा हक्क बिनविरोध निवडीमुळे हिरावून घेतला गेला आहे.

लोकशाही मूल्यांचे काय?

प्रत्यक्ष निवडणूक न होताच बिनविरोध विजयी झालेले उमेदवार आणि त्यांचे समर्थक जल्लोष साजरा करतात, विजयाचा गुलाल उधळतात, फटाके उडवतात, पेढे वाटतात. लोकशाहीचा उत्सव समजल्या जाणार्या निवडणुका न लढवता जिंकलेल्या उमेदवारांचे मुख्यमंत्रीही अभिनंदन करतात हे सारेच अनाकलनीय आहे. या आधीच्या अशाच एका निवडणुकीत विधानसभेच्या अध्यक्षांनीच आपल्या भावाच्या विरोधातील उमेदवाराला अर्ज मागे घेण्यासाठी दबाव टाकल्याचे ताजे उदाहरण आहे. बिनविरोध निवड कायदेशीररीत्या ग्राह्य असल्या तरी त्या धोकादायक ठरू शकतात. यातून एकपक्षीय वर्चस्वाला बळ मिळणार आहे. योग्य प्रतिनिधी निवडण्याच्या मतदाराच्या अधिकाराचे त्यात हनन होते. बिनविरोध निवडीमध्ये लोकशाही मूल्येच पायदळी तुडवली जातात. प्रतिस्पर्धी उमेदवाराला धमकावून पैशाची लालूच दाखवून माघार घ्यायला लावले जाते, तेव्हा लोकशाहीतील समान संधीच्या तत्त्वालाच हरताळ फसला जातो. लोकशाहीत विरोधी पक्ष देखील तेवढाच महत्त्वाचा असतो. विरोधक लोकशाहीचे रक्षक समजले जातात; परंतु बिनविरोध निवडणुकांमुळे विरोधी पक्ष क्षीण होत जातात. सत्ताधारी पक्ष एकतर्फी निर्णय मनमानीपणाचे निर्णय घेऊ शकतात. निवडणुका जिंकणे आणि त्याचे व्यवस्थापन करणे एवढेच ध्येय ठेवणारे राजकीय पक्ष तडजोडी करतात आणि निवडणुका एकतर्फी जिंकतात तेव्हा सामान्य मतदारांचा मतपेटीवरचा विश्वासच उडू लागतो. बिनविरोध निवडणूक हा एखाद्या उमेदवाराचा विजय असला तरी लोकशाहीतील चर्चा, वाद-विवाद, संवाद आणि लोकांचा सक्रिय सहभाग संपतो. राजकीय पक्षांसाठी बिनविरोध निवडणूक महत्त्वाची असली तरी मूलभूत हक्कांवर ती गदा आणते आणि लोकशाहीवरच आघात करते.

# संत चोखामेळा



संत चोखामेळा ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतले संत होते. संत नामदेव हे त्यांचे गुरु होते. सामाजिक विषमतेमुळे चोखोबा होरपळून निघाले. ते शूद्र अतिशूद्र, गावगाडा, समाज जीवन, भौतिक व्यवहार, उच्चनीचता व वर्णव्यवस्था यांच्या विळख्यात ते अडकले. संत चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ. उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करत, मात्र विठ्ठलाच्या नामात सतत दंग असत. दैन्य, दारिद्रय, वैंफल्य यांमुळे ते लौकिक जीवनात अस्वस्थ होते परंतु प्रत्यक्ष परमेश्र्वराने त्यांना जवळ केले, त्यांना संतसंग लाभला. त्यांना मंदिरांत प्रवेश नव्हता. इतरांप्रमाणे आपणही श्रीविठ्ठलाला उराउरी भेटावे असे खूप वाटत होते परंतु ते सावळे, गोजिरे रूप महाद्वारातूनच पाहावे लागे, ही खंत त्यांच्या मनात होती. चंद्रभागा नदीच्या वाळवंटात आध्यात्मिक लोकशाही संत ज्ञानदेवांमुळे १३व्या शतकात उदयाला आली. म्हणून संत चोखोबा म्हणतात, 'खटनट यावे, शुद्ध होऊनी जावे। दवंडी पिटीभावे डोळा।।' असा पुकारा करून त्यांनी वारकरी संप्रदायातील अध्यात्मनिष्ठ, अभेद भक्तीचे लोण आपल्या उपेक्षित बांधवांपर्यंत नेऊन पोहोचवले. आत्मविकासाची संधी तत्कालीन समाजरचनेतील अगदी तळातील लोकांनाही मिळावी असे सर्वच संतांना प्रांजळपणे वाटत होते. त्याच वेळी संत चोखोबांनी भक्तिमार्गाचा संदेश आपल्या अभंगांतून समाजबांधवांना दिला. संत चोखोबांचे भावविश्र्व अनुभवण्याचा प्रयत्न केला असता, एक मूक आक्रंदनाचा अनुभव येतो. 'हीन मज म्हणती देवा। कैसी घडो तुमची सेवा।' असा उपरोधिक प्रश्न ते देवालाच विचारतात. 'का म्हणून आम्ही या यातना सहन करावयाच्या, भगवंताच्या लेखी सर्व त्याचीच लेकरे आहेत ना, मग असा दुजाभाव का?' असे प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होऊन ते व्यथित होताना दिसतात. त्यांच्या अभंगरचना हृदयाला भिडणा-या आहेत.

'धाव घाली विठू आता। चालू नको मंद। बडवे मज मारिती। ऐसा काही तरी अपराध।।'

'जोहार मायबाप जोहार। तुमच्या महाराचा मी महार। बहु भुकेला जाहलो। तुमच्या उष्ट्यासाठी आलो।।'

'आमुची केली हीन याती। तुज कां न कळे श्रीपती। जन्म गेला उष्टे खाता। लाज न ये तुमचे चित्ता।।'

'ऊस डोंगा परि । रस नोहे डोंगा। काय भुललासी वरलीया रंगा।। चोखा डोंगा परि। भाव नोहे डोंगा।।'

'विठ्ठल विठ्ठल गजरी। अवघी दुमदुमली पंढरी।'

हे त्यांचे अभंग जनमानसामध्ये आजही लोकप्रिय आहेत. या सर्वांचे विठ्ठलावर अनन्यसाधारण प्रेम होते संत चोखोबा मंगळवेढ्याचे होते. त्यांना उपेक्षित बांधवांच्या उध्दाराची सतत चिंता होती. त्यांना समान हक्क मिळावेत, समाजातील तेढ कमी व्हावी, जातींमधील संघर्षाची भ्रामक कल्पना नष्ट व्हावी यासाठी त्यांनी भक्तिमार्गाद्वारे प्रयत्न केले. गावगाड्यातील गावकुसाचे काम चालू असताना भिंत पडून सर्व कामगारांचा अंत झाला. चोखोबाही त्यात होते. संत नामदेवांनी जेव्हा सर्व अस्थी गोळा केल्या तेव्हा ज्या अस्थीतून 'विठ्ठल विठ्ठल' असा नाद ऐकू आला त्या अस्थी चोखोबाच्या होत्या असे म्हणतात. नामदेवांनी मात्र चोखोबांना विठठलाजवळच अढळ स्थान दिले. पंढरपूरच्या देवळाच्या महाद्वारात पायरी जवळ नामदेवांनी संत चोखोबांची समाधी बांधली आहे.

# श्री महालक्ष्मी अंबाबाई:कोल्हापूर



भारतातील शक्तिदेवताच्या पीठापैकी साडे तीन पीठे महाराष्ट्रात आहे. त्यातील श्री क्षेत्र तुळजापूर हे पूर्ण व आद्यपीठ मानले जाते. महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यात वसलेले तुळजापूर हे महत्वाचे तीर्थक्षेत्र असून त्याठिकाणी तुळजाभवानी देवीचे प्राचीन मंदिर आहे. तुळजाभवानी देवीची महती तशी हिंदू पुराणातून खूपच विस्ताराने सांगितली गेली आहे. त्या माहितीनुसार असुरांचा, दैत्यांचा संहार करून विश्वात नीती व धर्माचरण यांची पुनर्स्थापना करण्याचे महत्त्वाचे कार्य तुळजाभवानी देवीने प्रत्येक युगामध्ये केले आहे.

स्वराज्य स्थापना करणारे छत्रपती श्री शिवाजी महाराज, भोसले घराण्याची ही कुलदेवता आहे. तुळजाभवानी देवीच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा मिळाली होती. देवीने महाराजांना दृष्टांत देऊन महाराष्ट्रावरील दुष्टचक्राचे निवारण करण्यासाठी भवानी तलवार दिली होती, अशी आख्यायिका आहे.

देवीचे मंदिर बालाघाटातील एका डोंगरमाथ्यावर असल्याने अगदी जवळ गेल्यावर देखील या मंदिराचा कळस दिसत नाही. मंदिराच्या काही भागाची बांधणी हेमाडपंती आहे. महाराष्ट्रात या देवीस विशेष महत्त्व असून नवरात्रीचा उत्सव जरी नऊ दिवसांचा असला तरी तुळजापूरला मात्र, हा उत्सव एकूण एकवीस दिवस चालतो.

तुळजाभवानी मंदिरात घटस्थापना आश्विन शुद्ध प्रतिपदेस होते. तत्पूर्वी देवीचे धार्मिक उत्सव भाद्रपद वद्य नवमीस सायंकाळपासून सुरू होतात. देवीची प्रत्यक्ष मूर्तीची शेजघरातील निद्रा वद्य नवमीस सायंकाळी सुरू होते. नवरात्रापूर्वी देवीची शेजघरातील निद्रा असते. या विधीस मोठे महत्त्व आहे. तसेच नवरात्रात प्रतिपदा ते अष्टमी कालावधीत रात्री भवानी मातेचा जागर होतो. प्रशाळपूजेनंतर देवीला विड्याच्या पानाचे घर बांधण्यात येते. नवमीला घटस्थापन करण्यात येते. दशमीला देवीचे पहाटे सीमोल्लंघन होते. तुळजापूरस्थित भवानी मंदिराच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत चांगली व्यवस्था लावून मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. भवानी मातेचे मंदिर खोलगट भागात आहे. मंदिराकडे जाण्यासाठी उताराचा रस्ता आहे. या मंदिरात प्रवेश करताच डाव्या हाताला तीर्थकुंडे आहेत. एकशे आठ झ-यांचे उगमस्थान असणारी ही तीर्थकुंडं कल्लोळतीर्थ व अमृतकुंड या नावांनी ओळखली जातात. मंदिराच्या उजवीकडे गोमुख तीर्थकुंड आहे. भाविक मंदिरात प्रवेश केल्यावर या सर्व देवतांचे दर्शन घेत दत्तपादुकांजवळ येऊन पोहोचतात. गाभा-याजवळील गणेश मूर्तीचे दर्शन करून तुळजाभवानीच्या मुख्य निंबाळकर दरवाजामधून देवीच्या मंदिरात प्रवेश केला जातो. गणेशमूर्तीच्या पाठीमागे मार्कंडेय ऋषी आहेत. उजवीकडे तुळजाभवानीचा नगारखाना आहे.

त्यानंतर गाभा-या समोरील पाच पाय-या उतरल्यानंतर देवीचे होमकुंड आहे. होमकुंडाचे मंदिर पुरातन हेमांडपंती पध्दतीचे आहे. होमकुंडावर उजव्या बाजूस टेकून गणेशमूर्ती आहे. होमकुंडाच्या पायाशी भैरवाची मूर्ती आहे. नवरात्रीच्या काळात भक्त राज्यभरातून ठिकठिकाणांहून पायी पालख्या घेऊन येतात.

छत्रपती शिवाजी महाराजांनी भवानी चरणी अर्पण केलेली सोन्याच्या पुतळ्याची माळ आजही देवीच्या मुख्य अलंकारांपैकी एक आहे. श्री तुळजाभवानी ही आदिशक्ती म्हणून सर्वश्रेष्ठ मानली गेली आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



खरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.डॉ. संजय देशपांडे, कन्सल्टंट सेक्सॉलॉजिस्टखरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. **(क्रमश. )**

## २ Joke विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message संदेश




Santa’s Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.- **डॉन प्याट**

**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दु:खी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### आडवे उत्तरे

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अवास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तरे

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### १८३.३३ च्या स्ट्राईक रेटने अफगाणी बॉलर्सला धुतलं! गंभीरही शॉक

दिल्ली-भारतीय आणि अफगाणिस्तान क्रिकेट संघांमधील एकमेव कसोटी मॅचमध्ये टीम इंडियाच्या फलंदाजांनी दमदार कामगिरी केल्यानंतर लोअर ऑर्डरमध्ये मोहम्मद सिराज मैदानात उतरला. मात्र, तो मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला आणि अफगाणिस्तानचा गोलंदाज सलीम सफी याच्या बॉलवर बाद होऊन पॅव्हेलियनमध्ये परतला. या मॅचमध्ये त्याला मोठी धावसंख्या उभारता आली नसली तरी सिराजने ज्या पद्धतीने बॅटिंग केली. ते पाहून सर्वांच्याच भूवया उंचावल्या आहेत.मोहम्मद सिराज टी-ट्वेंटीचं खुळ डोक्यात घेऊनच उतरला होता. गंभीरने फ्री हँड दिल्यानंतर सिराजने आपलं मॅजिक दाखवलं. पहिल्या बॉलपासून सिराजने बॉल बॉन्ड्री पार पोहोचवण्याचा प्रयत्न केला. सिराजने बॅट चालवली अन् चार फोर अन् एक खणखणीत सिक्स मारला. सिराज ११ बॉलमध्ये २२ रन्स करून २०० च्या स्ट्राईक रेटने खेळत होता पण मोहम्मद सलीम सैफीने सिराजची इनिंग एन्ड केली.

### ५६४ धावा करूनही भारताला घाम फोडला, कोण आहे सलीम साफी?

मुल्लानपुर-मुल्लानपुरच्या महाराज यादवेंद्र सिंह स्टेडिअमवर सूरू असलेला टेस्ट सामना रंगतदार स्थितीत सूरू आहे. या सामन्यात भारताने ८ विकेट गमावून ५६४ धावांवर आपला पहिला डाव आज घोषित केला होता.भारताची ही धावसंख्या पाहून खुप जास्तच धावा झाल्या आहेत, असे जरी वाटत असले तरी अफगाणिस्तानच्या एकाच गोलंदाजाने भारताला घाम फोडला होता.कारण त्याने एकट्याने भारताच्या सहा विकेट काढल्या होता. त्यामुळे हा खेळाडू नेमका कोण आहे? हे जाणून घेऊयात. भारताने केलेल्या ५६४ धावा जरी जास्तीच्या वाटत असल्या तरी या सगळ्यात अफगाणिस्तानचा गोलंदाज भाव खाऊन गेला आहे. कारण अफगाणिस्ताच्या सलीम साफीने भारताचा अर्धा संघ तंबुत पाठवला होता. सलीम साफीने यशस्वी जयस्वालची विकेट काढून आपल्या उत्कृष्ट स्पेलला सूरूवात केली. त्याने जयस्वालला २४ वर बाद केले. त्याच्यानंतर केएल राहुल आणि साई सुदर्शन यांच्यात पार्टनरशीप होत असताना त्यानेही जोडी फोडली. साई सुदर्शनला त्याने ८१ वर बाद केले. साईला बाद केल्यानंतर

त्याने शुभमन गिलला १२६ धावांवर बाद केले.

### अफगाणिस्तानला 'ही' चूक पडली महागात

चंदीगड-भारत विरुद्ध अफगाणिस्तान यांच्यात ६ जून पासून टेस्ट सामना खेळवला जातोय. चंदीगडच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर हा सामना खेळवला जात असून रविवारी या सामन्याचा दुसरा दिवस आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी हा सामना सुरु झाल्यावर दोन मिनिटांच्या अंतरात असं काही घडलं ज्यामुळे अफगाणिस्तानचा संघ सामन्यात खूप लांब गेला. चुकीचे निर्णय आणि डीआरएसचा वापर योग्य प्रकारे न केल्याने अफगाणिस्तानच्या संघाने रविवारी सकाळी भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल आणि विकेटकिपर फलंदाज ऋषभ पंतला लवकर पॅव्हेलियनमध्ये पाठवण्याची संधी गमावली.

अफगाणिस्तानच्या संघाने नाही घेतला रिव्ह्यू : भारत विरुद्ध अफगाणिस्तान सामन्याच्या पहिल्या दिवशी भारताचा फलंदाज केएल राहुलच्या बॅटच्या कडेला बॉल लागून सुद्धा अफगाणिस्तान संघाने रिव्ह्यू घेतला नाही आणि राहुलला जीवदान दिले. दुसऱ्या दिवशी सुद्धा अफगाणिस्तान संघाने हीच चूक पुन्हा ऐकली. ८९ वी ओव्हर सुरू असताना अझमतुल्ला उमरझाई नव्या बॉलने अप्रतिम गोलंदाजी करत होता. अझमतचा एक अचूक बॉल

शुभमन गिलच्या पॅडवर थेट जाऊन लागला.

### शमीचा कहर; हॅट्रिकने सामन्याचे चित्रच बदलले, तीन विकेट्स घेत रचला इतिहास

मुंबई-महाराष्ट्रात मुंबई टी२० लीग सुरु आहे, तर काही राज्यांमध्ये देखील लीग स्पर्धाना सुरुवात केली आहे. मागील काही महिन्यांमध्ये मोहम्मद शमीला भारतीय संघात स्थान मिळाले नाही. तो यंदा आयपीएल २०२६ लखनऊ सुपर जायंट्सच्या संघाकडून खेळला. त्याने सुरुवातीच्या सामन्यांमध्ये त्याची प्रभावशाली कामगिरी दाखवली. आता पुन्हा एकदा मोहम्मद शमीने केलेल्या कामगिरीनंतर क्रिकेट चाहत्यांचे लक्ष वेधले आहे. मागील अनेक महिन्यांपासून त्याला भारतीय संघात स्थान न मिळाल्यामुळे त्याच्यावर अनेकदा सोशल मिडियावर टीका केली आहे. कामगिरीने ट्रोलर्सला उत्तर दिले आहे. ६ जून रोजी आयर्लंड, इंग्लंड आणि आशियाई खेळांसाठी बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणा केली आहे. टीम इंडियाला टी२० संघाचा नवा कर्णधार मिळाला आहे, श्रेयस अय्यर याची भारतीय टी संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. श्राची राध टायगर्सविरुद्ध सर्वोटेक सिलीगुडी स्ट्रायकर्ससाठी पहिली हॅट-ट्रिक घेऊन शमीने इतिहास रचला.



# भारताचा दमदार विजय; जपानला हरवत आशिया कप जिंकला

काकामिगाहारा (जपान) : भारतीय अंडर-१८ पुरुष हॉकी संघाने अंडर-१८ आशिया कप २०२६ स्पर्धेत शानदार कामगिरी करत अंतिम सामन्यात जपानचा ४-१ असा पराभव करून सुवर्णपदक पटकावले. जपानमधील काकामिगाहारा येथे झालेल्या या सामन्यात भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत वर्चस्व गाजवले.

या विजयाचा खरा हिरो ठरला तो आशिष तानी पूर्ती. त्याने दुसर्या, २८व्या आणि ३४व्या मिनिटाला गोल करत शानदार हॅट-ट्रिक पूर्ण केली. त्याच्या अचूक फिनिशिंगमुळे भारताने सुरुवातीपासूनच आघाडी घेतली आणि ती शेवटपर्यंत कायम राखली. कर्णधार केतन कुशवाह यानेही ३०व्या मिनिटाला एक गोल करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. सामन्याच्या सुरुवातीलाच भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला आणि त्याचे रूपांतर गोलमध्ये करत आशिषने संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतरही भारतीय संघाने आक्रमक खेळ कायम ठेवला. दुसर्या क्वार्टरमध्ये जपानने काही संधी निर्माण केल्या, मात्र भारतीय बचावफळीने भक्कम प्रदर्शन करत त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरवले. २८व्या मिनिटाला पुन्हा एकदा पेनल्टी कॉर्नरवर आशिषने गोल करत आघाडी दुप्पट केली. त्यानंतर केतन कुशवाहने सुंदर समन्वयातून तिसरा गोल करत भारताला मध्यंतरापर्यंत ३-० अशी मजबूत आघाडी मिळवून दिली. तिसर्या क्वार्टरमध्येही भारताने आपला आक्रमक खेळ सुरू ठेवत आणखी एक गोल केला आणि सामना जवळजवळ आपल्या ताब्यात घेतला. शेवटच्या क्वार्टरमध्ये जपानकडून नुमाडा गाकूने एक गोल करत संघर्ष करण्याचा प्रयत्न केला, मात्र तो अपुरा ठरला. अखेर भारताने ४-१ असा विजय मिळवत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.या यशानंतर हॉकी इंडियाने खेळाडूंवर बक्षिसांचा वर्षाव केला. प्रत्येक खेळाडूला ३ लाख रुपये, तर सपोर्ट स्टाफला १.५ लाख रुपये देण्याची घोषणा करण्यात आली.एकूणच, भारतीय युवा संघाने उत्कृष्ट संघभावना, आक्रमकता आणि कौशल्य यांचा मिलाफ दाखवत आशिया कप जिंकत देशाचे नाव उंचावले.



## वैभव फक्त खेळायचे नाहीये, वर्चस्व गाजवायचे आहे!

दिल्ली-फक्त खेळायचे नाहीये तर वर्चस्व गाजवत खेळायचे आहेफ, अशा शब्दांत वैभव सूर्यवंशीने आपल्या भावना व्यक्त केल्या. राजस्थान रॉयल्स संघाने शेअर केलेल्या व्हीडिओत वैभवने आपल्या प्रवासाविषयी, कसं खेळायचं आहे याविषयी सांगितले. १५वर्षीय वैभवची आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारताच्या टी२० संघात निवड झाली. भारतीय संघात निवड होणारा तो सगळ्यात लहान वयाचा खेळाडू ठरला आहे.

काही दिवसांपूर्वीच आटोपलेल्या आयपीएल स्पर्धेत वैभवच्या बॅटचा तडाखा जगभरातील सगळ्याच गोलंदाजांना बसला. वैभवने ७७६ धावा करत ऑरेंज कॅप पटकावली. एका हंगामात सर्वाधिक षटकारांचा ख्रिस गेलचा विक्रम मोडला. वैभवने ७२ षटकार लगावले. मपुरस्कार, विक्रम हे सगळे चांगलेच आहे पण संघाला जिंकून देणारा खेळाडू व्हायचे आहेफ, असे वैभव सांगतो.

ममी जितकी वर्ष क्रिकेट खेळेन, पुढच्या २० वर्षात, जेवढे दिवस खेळेन, जेव्हा जेव्हा मला संधी मिळेल मग देशासाठी असो, फ्रँचाइजसाठी असो, तेव्हा लोकांनी माझ्या खेळाच्या परिणामाविषयी बोलायला हवं. जेव्हाही हा खेळाडू खेळतो तेव्हा एकहाती सामना जिंकून देतो असं लोकांनी म्हणायला हवं. नुसतं खेळलो, खेळत राहिलो असं नको. वर्चस्व गाजवून खेळायचं आहे. त्यासाठीच मी अथक परिश्रम करतो आहे. केवळ दिखाव्यासाठी मी खेळणार नाही. मी पुढची १०-२० वर्ष जेवढी संधी मिळेल तेवढे खेळेनफ, असे त्याने सांगितले.

ममला क्रिकेट खेळायला आवडते. जेवढी वर्ष खेळेन तेवढी वर्ष क्रिकेटचा आनंद घेत खेळायचं आहे. राजस्थान रॉयल्स संघातील वरिष्ठ खेळाडू, सपोर्ट स्टाफ, प्रशासकीय स्टाफ, सहकारी खेळाडू सगळे कुटुंबीयांप्रमाणे आहेत. मी कोणाशीही बोलू शकतो. मला काही अडलं, समजलं नाही तर विचारतोफ, असे त्याने सांगितले.

लिलावाच्या वेळी केवळ दोनच संघांनी बोली लावली याचं वैभवला वाईट होते. ममी चांगला खेळलो होतो. सगळे संघ मला घ्यायला प्रयत्नशील असतील असे वाटले होतेफ, असे वैभव म्हणाला. लिलावात दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात जोरदार चुरस झाली. अखेर राजस्थान रॉयल्सने १.१ कोटींच्या बोलीसह वैभवला ताफ्यात घेतले. शाळकरी वयाच्या मुलासाठी एवढी गुंतवणूक काहींना वेडेपणा वाटला असेल पण राजस्थानच्या कोअर टीमने वैभवचा खेळ पाहिला होता.

हा मुलगा भारतीय क्रिकेटचे भविष्य असू शकतो हे त्यांनी जाणले होते. त्यामुळेच वय लहान असले तरी राजस्थानने वैभवसाठी मोठी रक्कम खर्च केली.राजस्थान रॉयल्ससारख्या चांगल्या संघाने मला घेतलं यासाठी देवाचे आभार मानतो असं वैभवने सांगितलं.

प्रतिभावान खेळाडूंचा शोध लहान वयातच घेण्यात राजस्थानने नेहमीच पुढाकार घेतला आहे. संजू सॅमसन, यशस्वी जैस्वाल, रियान पराग हे सगळे खेळाडू लहान असतानाच राजस्थानच्या ताफ्यात दाखल झाले. त्यांनी संघासाठी दमदार कामगिरी केली.

## बॉल कुठे टाकायचा? रिषभने सांगून विकेट घेतली!



मुल्लानपूर-मुल्लानपूरच्या महाराजा यादवेंद्र स्टेडिअमवर सुरु असलेल्या पहिल्या सामन्याचा दुसरा दिवस आज संपुष्ठात आला आहे. या दुसऱ्या दिवसावर भारताचे वर्चस्व दिसून आले. कारण आज भारताने ८ विकेट गमावून ५६४ धावांवर आपला डाव घोषित केला होता. यासोबत भारताने अफगाणिस्तानच्या ११३ धावांमध्ये ५ विकेट गमावल्या होत्या. त्यामुळे खऱ्या अर्थाने आजचा दिवस भारताचा ठरला. तसेच अफगाणिस्तानची ही पाचवी विकेट रिषभ पंतने बोलून घेतली आहे. त्यामुळे ही विकेट नेमकी कशी घेतली आहे? हे जाणून घेऊयात.

खरं तर मानव सुतार दुसऱ्या दिवसाच्या सामन्याची शेवटची ओव्हर टाकायला मैदानात आला होता. यावेळी त्याच्यासमोर अफसर झझाई होता. यावेळी मानव सुतारने त्याच्या सूरूवातीच्या चारही बॉलवर अफसरला एकही धाव काढू दिली नाही. त्यानंतर पाचव्या बॉलआधी रिषभ पंत विकेटमागून पुढे आला आणि त्याने पीचवर सर्कल केलं. आणि याच सर्कलवर त्याने मानव सुतारला बॉल टाकण्यास सांगितले. रिषभने सांगितल्याप्रमाणे मानव सुतारने बॉल टाकला आणि तिथेच अफसर फसला. कारण पाय मागे घेऊन बॉल मारताच बॅटीटी कड लागली आणि मानव सुतारने कॅच घेतली. अशाप्रकारे रिषभ पंतने बोलून ही विकेट मानव सुतारच्या झोळीत टाकली.

अफगाणिस्तानच्या डावाबद्दल बोलायचं झालं तर त्यांची सूरूवात चांगली झाली नव्हती.कारण अब्दुल मलिकला १६ धावांवर मानव सुथारने कॅच आऊट केले. त्यानंतर सादिकुल्लाह अट १७ धावांवर प्रसिद्ध कृष्णाने क्लिन बोल्ड केले. त्याच्यानंतर रहमनुल्लाह गुरबाज मैदानात आला होता,त्याला मानव सुतारने चकवून साई सुदर्शनच्या हातात कॅच आऊट केले. तो १२ धावांवर बाद झाला.

त्याच्यानंतर रहमत शाह मैदानात आला.त्याने मैदानात टीचून फलंदाजी केली. त्यानंतर हशमुतुल्लाह शाहिदीला २० धावांवर प्रसिद्ध कृष्णाने एलबीडब्ल्यु आऊट केले. त्यानंतर अफसर झझाईने ३ धावांवर मानव सुतारने विकेट घेतली.अशाप्रकारे अफगाणिस्ताने दिवसअखेर ११३ धावांवर ५ विकेट गमावल्या होत्या. आता टीम इंडियाने अशीच भेदक गोलंदाजी सूरू ठेवली तर अफगाणिस्तान ऑलआऊट होण्याची शक्यता आहे. आणि त्यांना फॉलऑनचाही धोका असणार आहे. दरम्यान आजच्या सामन्यात मानव सुतारने एकट्याने १६ ओव्हर गोलंदाजी करून २१ धावा दिल्या. तसेच यासोबत तीन विकेटही काढल्या.



अमेरिकेतील सॅन अँटोनियो येथे एनबीए बास्केटबॉल सामन्यात स्पर्धा करताना न्यूयॉर्क निक्स आणि सॅन अँटोनियो स्पर्स संघांचे खेळाडू.

## २५ वर्षात कुणालाच जमले नाही, ते डेब्यूमध्ये करून दाखवले, मानव सुथारने इतिहास घडवला!

न्यू चंडीगढ- गाणिस्तानविरुद्धच्या एकमेव टेस्ट मॅचमध्ये टीम इंडिया मजबूत स्थितीमध्ये पोहाचली आहे. मॅचच्या दुसऱ्या दिवशी टीम इंडियाने ५६४८ वर त्यांचा डाव घोषित केला. शुभमन गिलने १२६ तर केएल राहुलने १०० रन केले. याशिवाय साई सुदर्शनने ८१, ऋषभ पंतने ५२ रनचं योगदान दिलं. अफगाणिस्तानकडून मोहम्मद सलीम सैफी याने सर्वाधिक ६ विकेट घेतल्या, तर झियाउर रहमान शरिफी याने १ आणि हशमतुल्लाह शाहिदीने १ विकेट घेतली.भारताने इनिंग घोषित केल्यानंतर दिवसाचा खेळ संपला तेव्हा अफगाणिस्तानचा स्कोअर ११३५ एवढा झाला आहे तसंच ते अजून ४५१ रननी पिछाडीवर आहेत. भारताकडून मानव सुथारने ३ विकेट घेतल्या आहेत तर प्रसिद्ध कृष्णाला २ विकेट मिळाल्या आहेत. मानव सुथार याचं हे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधलं पदार्पण आहे. मानव सुथारसाठी हा सामना स्वप्नवत ठरत आहे. टीम इंडियाचा कर्णधार शुभमन गिलने दुसऱ्या दिवशीच्या टी आधी सुथारकडे बॉल दिला आणि आपल्या टेस्ट करिअरच्या चौथ्याच बॉलवर त्याने विकेट घेतली. अफगाणिस्तानचा बॅटर अब्दुल मलिकने स्वीप शॉट मारण्याचा प्रयत्न केला, पण बॉल बॅटच्या एजला लागून बॅकवर्ड स्क्वेअर लेगच्या दिशेने गेला जिथे मोहम्मद सिराजने उत्कृष्ट कॅच पकडला.मानव सुथारने पहिली टेस्ट विकेट मिळताच जल्लोष केला, तसंच टीम इंडियाच्या इतर खेळाडूंनीही त्याला मिठी मारली. मानव सुथार याच्यासाठी हा क्षण फक्त अविस्मरणीयच नाही तर ऐतिहासिकही होता.आपल्या टेस्ट करिअरच्या पहिल्याच ओव्हरमध्ये विकेट घेणारा मानव सुथार हा आठवा भारतीय खेळाडू ठरला आहे. या खास यादीमध्ये मोंटू बॅनर्जी (वेस्ट इंडिजविरुद्ध, १९४८), मनोहर हार्डिकर (वेस्ट इंडिजविरुद्ध, १९५८), वामन कुमार (पाकिस्तानविरुद्ध, १९६१), चेतन शर्मा (पाकिस्तानविरुद्ध, १९८४), डब्ल्यू. व्ही. रमण (वेस्ट इंडिजविरुद्ध, १९८८), निलेश कुलकर्णी (श्रीलंकाविरुद्ध, १९९७) आणि टिनू योहानन (इंग्लंडविरुद्ध, २००१) यांचा समावेश आहे.टिनू योहाननने २००१ साली इंग्लंडविरुद्ध पदार्पण करताना मार्कस ट्रेस्कोथिकला पहिल्याच ओव्हरमध्ये आऊट केलं, त्यानंतर २५ वर्षांमध्ये कोणत्याच भारतीय खेळाडूला हा टप्पा गाठता आला नव्हता. या सामन्यात कर्णधार गिल आणि कोच गंभीरने हर्ष दुबेऐवजी मानव सुथारवर विश्वास दाखवून त्याला पदार्पणाची संधी दिली. सुथारने त्याच्यावर दाखवलेला हा विश्वास सार्थ ठरवला. या सामन्यामध्ये मानव सुथार याला टीमचा सीनियर स्पिनर कुलदीप यादव याच्याकडून टेस्ट कॅप मिळाली. २०२१ मध्ये अक्षर पटेलने पदार्पण केल्यानंतर मानव सुथार टीम इंडियाकडून टेस्टमध्ये पदार्पण करणारा स्पिन बॉलर ठरला.

# जिंकूनही आरसीबी च्या एकाही खेळाडूचा भारतीय संघात नाही

मुंबई-२०२६ च्या टी-२० विश्वचषकानंतर, भारतीय संघ या फॉरमॅटमधील आपली पुढील मालिका आयर्लंडच्या दौऱ्यावर खेळेल, जिथं २६ जूनपासून दोन सामन्यांची मालिका खेळवली जाईल. यानंतर, भारतीय संघ १ जुलैपासून इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची टी-३० मालिका खेळेल. बीसीसीआयनं ६ जून रोजी या दोन्ही मालिका आणि २०२६ च्या आशियाई खेळांसाठी भारतीय संघाचा संघ जाहीर केला.

भारतीय संघात मोठे बदल : बीसीसीआयनं संघ जाहीर करताना काही महत्त्वपूर्ण बदल केले, ज्यात आयपीएल २०२६ हंगामात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या खेळाडूंना संधी देण्यात आली, तर काही खेळाडू निराश झाले. भारतीय संघाकडे पाहता, १० पैकी नऊ आयपीएल संघांमधील किमान एक खेळाडू भारतीय संघात आहे, तर सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावलेला रॉयल चॅलेंजर्स बंगळूर हा एकमेव संघ आहे, ज्याचा एकही खेळाडू भारतीय संघात नाही.



एींप चे सर्वाधिक खेळाडू : टी-२० मालिका आणि २०२६ च्या आशियाई खेळांसाठी जाहीर झालेल्या भारतीय संघात सनरायझर्स हैदराबादमधून सर्वाधिक खेळाडूंची निवड करण्यात आली आहे, ज्यात अभिषेक शर्मा, इशान किशन आणि नितीश कुमार रेड्डी यांचा समावेश आहे. याशिवाय, सहा संघांना भारतीय संघातून प्रत्येकी दोन खेळाडू मिळाले आहेत. पंजाब किंग्समधून नवीन टी-२० कर्णधार श्रेयस अय्यर आणि अर्शदीप सिंग यांचा समावेश आहे, तर राजस्थान रॉयल्सने वैभव सूर्यवंशी आणि रवी बिश्नोई यांचा संघात समावेश केला आहे.

दोन संघांचे १-१ खेळाडू : मुंबई इंडियन्स संघात तिलक वर्मा, ज्याला उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे, आणि केवळ आशियाई खेळांमध्ये सहभागी होणाऱ्या जसप्रीत बुमराहची निवड झाली आहे. चेन्नई सुपर किंग्सनं शिवम दुबे आणि संजू सॅमसन यांची निवड केली आहे. गुजरात टायटन्सनं मोहम्मद सिराज आणि वॉशिंग्टन सुंदर यांचा समावेश केला आहे. कोलकाता नाइट रायडर्सकडून वरुण चक्रवर्तीचा समावेश करण्यात आला आहे, तसंच दुखापतीमुळं बराच काळ संघाबाहेर असलेल्या हर्षित राणाचाही संघात समावेश आहे. दिल्ली कॅपिटल्सचा अक्षर पटेल आणि लखनऊ सुपर जायंट्सचा वेगवान गोलंदाज प्रिन्स यादव यांचाही संघात समावेश आहे.

आरसीबीच्या रजत पाटीदारला संधी मिळण्याची होती अपेक्षा : रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने आयपीएल २०२६ हंगामात मैदानावर उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या विजेतेपदाचे यशस्वीपणे रक्षण केलं. आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारने या हंगामात १५ सामन्यांमध्ये ५०४ धावा करत फलंदाजीत उत्कृष्ट कामगिरी केली होती आणि त्याची भारतीय टी-२० संघात निवड होण्याची आशा होती, पण तसे झाले नाही. इतकंच नव्हे तर ९ जूनपासून श्रीलंकेत सुरु होणाऱ्या 'अ' संघाच्या वनडे तिरंगी मालिकेसाठी भारतीय संघात आरसीबीच्या एकाही खेळाडूचा समावेश नाही.

## जागतिक पर्यावरण दिना निमित्त वृक्षारोपण

### एसीईए आणि अल्ट्राटेक सिमेंट कंपनीचा स्तुत्य उपक्रम




**लातूर/प्रतिनिधी :** ५ जून जागतिक पर्यावरण दिन निमित्ताने अल्ट्राटेक सिमेंट कंपनी व असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग इंजिनियर्स आर्किटेक्ट आणि सिव्हिल ड्राफ्ट्समनच्या संयुक्त विद्यमाने अंबेजोगाई रोड परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. हरित लातूर सुंदर लातूर असा होता या कार्यक्रमासाठी कंपनीचे लातूरचे अल्ट्राटेक कंपनीचे अधिकारी श्रीनिवास कोक्कुल आणि त्यांची टीम तसेच असोसिएशनकडून डॉ. अभिजीत देशपांडे सरसंबेकर, असोसिएशनचे अध्यक्ष मनोज देशमुख, सचिव वसीम शेख, रणजीत साळुंखे, विनोद उदगीरकर, गुलाब शेख अन्सार शेख, आसिफ शेख, रिजवान गडीवाले, वामन पाटील यांच्यासह असोसिएशनचे इतर पदाधिकारी उपस्थित होते, यावेळी एसीईए आणि सिमेंट कंपनी पदाधिकारी यांच्या वतीने झाडे लावा झाडे जगवाचा असा संदेश देण्यात आला.

## आमदार अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या घेतल्या भेटी

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. ६ जुन रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी नागरिक यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेऊन त्यांच्या निमंत्रनाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी माजी आमदार वैजनाथ शिंदे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर शिवाजी जवळगेकर, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास को ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन किरण जाधव, व्हाईस चेअरमन समद पटेल, यशवंतराव पाटील, विजयकुमार साबदे, एस.आर पाटील, सय्यद मोइनउल्ला, विकास कांबळे, विकास देशमुख, व्यंकटराव गर्जे, व्यंकटेश पुरी, गोविंद देशमुख, सचिन मस्के, अल्लाबक्ष शेख, सुनील बसपुरे, राजकुमार कत्ते, गणेश एस.आर देशमुख, विष्णुदास धायगुडे, सुरेश चव्हाण, एकनाथ पाटील, शेषेराव नंदगावे, छाया मस्के, उत्तम जाधव, मिनीनाथ मगर, संजय राठोड, लिंबा जाधव, सुनील राठोड हुसेनबी शेख, भगवान डोंगरे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

# जिल्ह्यातील शहराबरोबरच ग्रामीण भागाकडे प्राधान्याने लक्ष देऊन विकासाचे प्रश्न निश्चितपणे मार्गी लावू - पाटील

## आ. कराड यांच्या संवाद कार्यालयास महायुतीचे उमेदवार पाटील यांची सदिच्छा भेट

**लातूर प्रतिनिधी:** भाजपाचा जिल्हाध्यक्ष झाला की आमदार होतो ही रमेशआप्पा पासून सुरु झालेली परंपरा यापुढेही कायम राहील यात शंका नाही जिल्ह्यातील रमेशआप्पा, संभाजीभैय्या आणि अभिमन्यू हे तिन्ही आमदार कार्यक्षमतेने काम करीत आहेत. त्यांच्या सोबत काम करण्याची पक्षाने उमेदवारी देऊन संधी दिली जिल्ह्यातील शहराबरोबरच ग्रामीण भागाकडे प्राधान्याने लक्ष देऊन विकासाचे प्रश्न निश्चितपणे मार्गी लावू अशी ग्वाही भाजपा महायुतीचे उमेदवार श्री. बसवराज पाटील मुरूमकर यांनी दिली.




धाराशिव, लातूर व बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील भाजपा महायुतीचे उमेदवार तथा भाजपाचे जिल्हाध्यक्ष श्री. बसवराज पाटील मुरूमकर यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या संवाद या भाजपा कार्यालयास शुक्रवारी सायंकाळी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिल्हा बँकेचे माजी चेअरमन नाथसिंह देशमुख, प्रदेश ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, जेष्ठ पत्रकार प्रा. बीबी मोतीपवळे यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी आ. रमेशआप्पा कराड यांनी उमेदवार बसवराज पाटील यांचा लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाच्या वतीने यथोचित सत्कार करून त्यांचे स्वागत केले.

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून भाजपा महायुतीच्या वतीने लातूर जिल्ह्याला उमेदवारी मिळावी अशा प्रकारची मागणी रमेशआप्पा कराड यांच्यासह जिल्ह्यातील आमदार आणि नेते मंडळींनी केली होती असे सांगून यावेळी बोलताना उमेदवार बसवराज पाटील म्हणाले की, राज्यात लातूर जिल्हा आगळावेगळा जिल्हा असून या जिल्ह्याकडे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे विशेष लक्ष आहे. या जिल्ह्याकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. त्यांनी आणि चंद्रशेखर बावनकुळे साहेबांनी मोठा विश्वास ठेवून जिल्ह्यावर जबाबदारी टाकली असे बोलून उमेदवारी दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार मानले.

जिल्ह्यातील रमेशआप्पा, संभाजीभैय्या आणि अभिमन्यू पवार हे तिन्ही आमदार कार्यक्षमतेने काम करीत आहेत. भविष्यात त्यांच्यासोबत काम करण्याची मला संधी मिळणार आहे रमेशआप्पांनी पक्षाचे संघटन वाढविण्याचे काम केले असून भविष्यात जिल्ह्यात आणखी चांगल्या पद्धतीने संघटन वाढवावे लागणार आहे असेही महायुतीचे उमेदवार तथा भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी बोलून दाखविले.

प्रारंभी आ. रमेशआप्पा कराड यांनी स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार म्हणून जाहीर झाल्यानंतर पहिल्यांदाच संवाद कार्यालयात आल्याबद्दल त्यांचे मनापासून स्वागत करून बसवराज पाटील यांचा विजय विक्रमी मताधिक्याने होणार असल्याचे बोलून दाखविले. आमच्यावर जी जबाबदारी द्याल ती आम्ही निश्चितपणे यशस्वी पार पाडू अशीही ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज शिंदे यांनी केले. यावेळी भाजपाचे मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, उपसभापती शरद दरेकर, पद्माकर चिंचोलकर, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, सतीश आंबेकर, पांडुरंग बालवाड, दीपक वांगसकर, विजय चव्हाण, राजू अत्तार, दत्ता सरवदे, शेख अजीम, महेश गाडे, शेख मोहसीन, राजेंद्र काळे, सुकेश भंडारे, रुपेश काळे, सिद्धेश्वर मामडगे, विनायक मगर, शंकर चव्हाण, सोमनाथ वाघमारे, ज्ञानेश्वर जुगल, मारुती शिंदे, बालाजी राठोड, किशन क्षिरसागर, अजित पाटील, किरण मुंडे, धनंजय पवार, निवृत्ती चिद्रे, दिपक पवार, श्रीमंत नागरगोजे, संतोष चव्हाण, रविंद्र नागरगोजे, रमेश चव्हाण, दत्ता सप्पाळ, लक्ष्मण खलंग्रे यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लातूर वृक्ष चळवळीला चिमुकल्यांनी दिला नवांकुर!

## पर्यावरण दिनी दहा हजार झाडांचा १० वा वाढदिवस थाटात

**लातूर/प्रतिनिधी : महानगरपालिकासह ५२ संस्थानी एकत्र येऊन जी लातूर वृक्ष चळवळ उभी केली, या चळवळीने लातूर शहरात २०१६ साली जी १० हजार झाडे लावली त्या झाडांचा दहावा वाढदिवस साजरा करण्यात आला. आणि निसर्ग वाचला तरच आपण वाचू असा संदेश दिला. लातूर वृक्ष, स्टीम एज्युकेशन, सह्याद्री देवराई, माझं घर या संस्थाच्या वतीने औसा रोडवरील स्टीम एज्यूकेशन संस्थेच्या आवारात ५ जून रोजी चिमुकल्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून, आदर्श कॉलनी पर्यंत वृक्षदिंडी काढून, तसेच माझं घरच्या विद्यार्थ्यांनी प्रदूषण विरोधी संदेश देत बुधोडा ते लातूर सायकल रॅली काढून जागतिक पर्यावरण दिन साजरा केला.**

यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या बोबड्या भाषेत झाडांचे महत्व सांगून लातूर वृक्ष चळवळीला एक नवा अंकुर दिला. या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध अभिनेत्री नम्रता गायकवाड उपस्थित राहणार होत्या. मात्र काही कारणास्तव येऊ शकल्या नाहीत. १५ जुलै च्या नंतर त्या येणार आहे. त्यांनी व्हिडीओ संदेश देऊन शुभेच्छा दिल्या आहेत. लातूर वृक्ष चळवळ व सह्याद्री देवराईच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध उपक्रमांनी दिवसभर वातावरण निर्मिती केली. सकाळी स्टीम एज्युकेशन, पाटील प्लाझा जवळ, औसा रोड येथे शालेय मुलांच्या उपस्थितीत १० हजार झाडांचा वाढदिवस साजरा झाला. त्यानंतर आदर्श कॉलनी ते स्टीम एज्युकेशनपर्यंत लहान मुलांची वृक्ष-पर्यावरण दिंडी काढण्यात आली. 'माझं घर' प्रकल्पातील मुलं बुधोड्याहून सायकल रॅली काढत लातूरमध्ये दाखल झाली. या वयातही पर्यावरणप्रेम जागवणाऱ्या जिजा पाटील या चिमुकलीने 'माझ्या आंब्याच्या झाडाची कथा' सादर केली. स्वतः खाल्लेल्या आंब्याच्या कोयीपासून रोप तयार करून तिने तयार केलेल्या झाडाची ही हृद्य गोष्ट सर्वांना भावली. शेकडो महिला भगिनींच्या सहभागाने औसा रोडवरील स्टीम एज्युकेशनच्या पाठीमागील ग्रीन बेल्टमध्ये ऑक्सिजन झोन निर्मितीचा शुभारंभ करण्यात आला. ताम्हण, वड, पिंपळ, कडुलिंब अशा स्थानिक २५ झाडांचे प्रतिनिधिक वृक्षारोपण झाले. प्रास्ताविक करताना लातूर वृक्ष चळवळीचे समन्वयक सुपर्ण जगताप यांनी दिवसभराच्या कार्यक्रमाची माहिती दिली. वातावरण बदलामुळे उष्णतेचे संकट वाढले असून, पाऊस पडल्याशिवाय मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण न करण्याचा सल्ला त्यांनी दिला. याचवेळी लातूर कॉलेज ऑफ फार्मसीचे विद्यार्थी संजीवनी बेटावर दुर्मिळ वनस्पती ओळख, बीज संकलन व प्लास्टिक निर्मूलन अभियानासाठी रवाना झाले. कार्यक्रमाला नगरसेविका स्वाती घोरपडे, डॉ. नीलम पन्हाळे, स्टीम एज्युकेशनचे ओमप्रकाश झुरळे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. बी आर पाटील, श्रीकांत करवा, शरद झरे, ड. बालाजी इंगळे, लातूर मनपाचे उद्यान विभाग प्रमुख समाधान सूर्यवंशी, कलीम शेख, अमृत सोनवणे, रितेश चापसी, नेताजी जाधव, धवल मशरू, महेश बिडवे, कल्पना झुरळे, मुख्याध्यापिका अंजू व्यास, उमा माने, गौरी देशमुख, प्रियांका झेरिकुंटे, अक्षय पंचाक्षरी यांच्यासह लातूर वृक्ष चळवळ, सह्याद्री देवराई, स्टीम एज्युकेशन, लातूर कॉलेज ऑफ फार्मसी , सह्याद्री देवराई हासेगाव, माझं घर बुधोडा व लातूर शहर महानगरपालिकेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रारूप विकास आराखड्याबाबत सूचना करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने लातूर शहराचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात येत आहे. या संदर्भात नागरिकांच्या काही अपेक्षा व सूचना असतील तर त्या कळविण्याचे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. मनपाच्या सर्वसाधारण सभेने २०२३ मध्ये प्रारूप विकास योजना तयार करण्यास मान्यता दिलेली आहे. ही योजना तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या आराखड्याबाबत शहर व परिसरातील स्थानिक नागरिक, व्यावसायिक,मालमत्ताधारक, विकसक व काही विभागांना सूचना करावयाच्या असतील तर त्यांच्यासाठी ही संधी आहे.शहराची खरीखुरी गरज काय आहे? हे या माध्यमातून कळू शकते. अशी माहिती संकलित करणे, सार्वजनिक कारणांसाठी लागणारी नवीन आरक्षणे, पाणीपुरवठा, ड्रेनेज,स्मशानभूमी, दुकाने, नवीन रस्ते व भविष्यातील अपेक्षित सोयी- सुविधा या संदर्भातील प्रश्नावली दि. ८ जून रोजी कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिकांनी या संदर्भातील आपले मत व सूचना लेखी प्रश्नावली मध्ये भरून नगर रचना विभाग येथे दि. ९ व १० जून पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये दाखल करावयाच्या आहेत. या सूचनामुळे प्रारूप विकास आराखडा सर्वसमावेशक व लोकाभिमुख पद्धतीने तयार करता येणार आहे. नागरिकांनी आपल्या सूचना कळवाव्यात, असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# आ. अमित देशमुख यांनी सुतेज प्रताप माने पाटील कुटुंबियांचे केले सांत्वन

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी प्रताप विश्वंभरराव माने पाटील यांचे नुकतेच निधन झाले आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. ६ जुन रोजी दुपारी शिरुर अनंतपाळ तालुक्यातील लक्कड जवळगा येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली, भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांचे सुपुत्र सुतेज प्रताप माने पाटील, अर्जुन प्रताप माने पाटील व माने पाटील कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. त्यांना धीर दिला.



शिरुर अनंतपाळ तालुक्यातील लक्कड जवळगा येथील काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रताप विश्वंभरराव माने पाटील यांचे नुकतेच निधन झाले आहे. शिरुर अनंतपाळ तालुक्यातील लक्कड जवळगा येथील शिरुर अनंतपाळ युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुतेज प्रताप माने पाटील यांच्या मातोश्री निवासस्थानी जाऊन काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रताप विश्वंभरराव माने पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली, भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांचे सुपुत्र सुतेज प्रताप माने पाटील, अर्जुन प्रताप माने पाटील व माने पाटील कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. त्यांना धीर दिला.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक जयेश विश्वंभरराव माने पाटील, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, साकोळचे जिल्हा परिषद सदस्य माणिक गायकवाड, अनील चव्हाण, संजय बिराजदार, सुधीर लखनगावे, बसवराज मठपती, गणेश एसआर देशमुख, महेश तिवारी, बाळासाहेब पाटील, ज्ञानेश्वर पाटील, आदींसह माने पाटील कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.

# देशातील अव्वल गायिका सायली टाकची दयानंद कला महाविद्यालयात एंट्री

## प्रतिभेच्या जडणघडणीची जबाबदारी महाविद्यालयाने घेतली

**लातूर/प्रतिनिधी :** मराठवाड्यातील अग्रगण्य व प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था म्हणून ओळख असलेल्या दयानंद कला महाविद्यालयाने आणखी एका गुणी कलावंत विद्यार्थिनीचे स्वागत करून आपल्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेत नवा अध्याय जोडला आहे. राष्ट्रीय कला उत्सव स्पर्धेत देशात प्रथम क्रमांक पटकावणारी तसेच स्टार प्रवाह वाहिनीवरील लोकप्रिय मी होणार सुपरस्टारया रिॲलिटी शोची विजेती कु. सायली टाक हिने दयानंद कला महाविद्यालयात बी.ए. प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतला आहे.

कु. सायली टाक हिचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते तिच्या पालकांच्या उपस्थितीत औपचारिक स्वागत करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाने तिच्या कलाविकासासाठी आवश्यक सर्व शैक्षणिक व सांस्कृतिक सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त करत तिचे पालकत्व स्वीकारल्याची भावना व्यक्त केली.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शाह, उपाध्यक्ष रमेशकुमारजी राठी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली दयानंद कला महाविद्यालय हे संगीत, नाट्य, चित्रकला, कीर्तन आणि विविध कलाविषयांच्या दर्जेदार शिक्षणासाठी प्रसिद्ध आहे. महाविद्यालयात संगीतासाठी सुसज्ज वाद्यसंग्रह, नाट्यप्रशिक्षणासाठी रंगमंच तसेच विविध सांस्कृतिक उपक्रमांसाठी



आवश्यक आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य दिशा, व्यासपीठ आणि प्रेरणा मिळते.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवात मागील अनेक वर्षांपासून सर्वाधिक सर्वसाधारण विजेतेपद पटकावणारे दयानंद कला महाविद्यालय हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे. कलावंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दयानंद शिक्षण संस्थेमार्फत लाखो रुपयांच्या शिष्यवृत्तीही दिल्या जातात. याचा लाभ घेत अनेक विद्यार्थी आज दूरदर्शन, चित्रपट आणि व्यावसायिक कलाक्षेत्रात यशस्वी कारकीर्द घडवत आहेत. आतापर्यंत या महाविद्यालयातील ३१ विद्यार्थी दूरदर्शन व चित्रपटसृष्टीत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात यशस्वी झाले आहेत.

सायली टाक हिने राष्ट्रीय कला उत्सव स्पर्धेत भारतात प्रथम क्रमांक मिळवून राज्याचे नाव उज्ज्वल केले आहे. तसेच प्रा. शशिकांत देशमुख व डॉ. वृशाली देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तिला सीसीआरटी शिष्यवृत्तीही प्राप्त झाली आहे.

यावेळी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, संगीत विभाग प्रमुख व आयक्यूएसी प्रमुख डॉ. संतोष पाटील, डॉ. सुनील साळुंके, डॉ. प्रदीप सूर्यवंशी, प्रा. डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. सुवर्णा लवंद, डॉ. दुर्गा शर्मा, कार्यालयीन अधीक्षक संजय व्यास तसेच सुनील टाक यांची प्रमुख उपस्थिती होती.

दयानंद कला महाविद्यालयाची समृद्ध सांस्कृतिक परंपरा विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, कला-संवेदना आणि सामाजिक बांधिलकी विकसित करत आहे. त्यामुळे हे महाविद्यालय नवोदित कलावंतांसाठी केवळ शिक्षणसंस्था नसून एक सृजनशील संस्कारकेंद्र म्हणून उदयास आले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# ईपीएस-९५ राष्ट्रीय संघर्ष समिती सदस्य अजय वीर योध्दा पुरस्काराने सन्मानीत

**धाराशिव/(शीला उंबरे-पेंढरकर):** ईपीएस-९५ राष्ट्रीस संघर्ष समिती द्वारा ज्या सदस्यांनी वयाची ७५ वर्ष पूर्ण केली आहेत. अशा जेष्ठ नागरिकांचा अजय वीर योध्दा प्रमाणपत्र पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. ०६ जून हा संघटनेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत यांच्या सुचनेनुसार संपूर्ण भारतभर संघटनेचा वर्धापन दिन साजरा करण्यात येत आहे. धाराशिव येथेही संघटनेच्या तुळजाभवानी क्रीडा संकुलातील कार्यालयात संघटनेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी जेष्ठ नागरिक रामेश्वर भगवान शेंडगे हे होते. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य समन्वयक यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

या प्रसंगी संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत (दादा) थोरात यांनी संघटनेची भूमिका विशद केली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विजय गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबा सोनटक्के यांनी केले. या कार्यक्रमास रामेश्वर शेंडगे, जनार्धन इंगळे, शिवाजी शिंदे, विष्णु गायकवाड, फकरोद्दीन सय्यद, यशवंत पेठे, अशोक पांडव, निवृत्ती गायकवाड यांचा प्रातिनिधीक स्वरुपात प्रमाणपत्र, पुष्पहार देवून सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास आबा पाटील, सिताराम भालेराव, संभाजी जाधव, मल्लीकार्जुन खुने, गुंडू चंडकापुरे, शिवशाहीर माने, आबाराव साळुंके, बालाजी काकडे, धनराज पाटील, रामदास हळकंबे, अनंत मगर, मल्लीकार्जुन राजमाने, अनभुले साहेब इत्यादी सदस्याची उपस्थिती होती.

# उमाकांत गायकवाड यांची मुलनिवासी संघ धाराशिव जिल्हा प्रभारी म्हणून निवड

**धाराशिव (शेख अंजुम):** बामसेफची एक शाखा मुलनिवास संघ धाराशिव जिल्हयाच्या प्रभारी पदी सामाजिक कार्यकर्ते उमाकांत गायकवाड यांची निवड जाहिर केली आहे. धाराशिव येथील कार्यक्रमात मुलनिवासी संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य अंकुश बनसोडे ङ भारत ननवरे, पी.पी. आय.डी. महाराष्ट्राचे महाराष्ट्र संघटन सचिव मारुती पवार, विजय गायकवाड इत्यादीची उपस्थिती होती. यावेळी बोलताना अंकुश बनसोडे म्हणाले की, कार्यकर्त्यांनी किंमत चुकवल्याशिवाय परिवर्तन होत नाही. संघटन हे फुले, शाहू आंबेडकर यांच्या विचारधारेनुसार कार्य करत आहे. कार्यकर्त्यांनी संघटनेसाठी जीवनातील वेळ, धन, ज्ञान व फुले शाहू आंबेडकराच्या तत्त्वज्ञानानुसार वाटचाल करावी लागणार आहे. तेंव्हा जास्तीत जास्त तरुण कार्यकर्त्यांनी या संघटनेच्या कार्यात सहभाग नोंदवावा.

# मुलीस झोप लागली असता तिच्यावर लैंगीक अत्याचार

**धाराशिव/प्रतिनिधी:** परंडा पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील २४ वर्षीय मुलगी दि.२५.०५.२०२६ रोजी हि घरी असताना गावातील एक तरुणानी मोबाईल चार्जिंगला लाण्याचा असे कारण काढुन नमुद मुलीस ज्युस देवून ज्युस पिल्याने नमुद मुलीस झोप लागली असता तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. त्याचे छायाचित्रीकरण करुन नमुद मुलगी शुध्दीवर आल्यास तु कोणालाही हे सागिंतले तर तुझे छायाचित्रीकरण व्हायरल करेन अशी धमकी दिली.तसेच गावातील दुसऱ्या तरुणानी नमुद मुलगी ही घरी असताना तिचे घरी जावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. व दि. ०३.०६.२०२६ रोजी १६.०० वा. सु. गावातील तिसऱ्या तरुणानी नमुद मुलीस त्याचे घरी घेवून जावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.०५.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या. सं.कलम-६४(१),६४(२), ७७, १२३, ३३३, ३५१(२) सह कलम ३(२)(व्हीए) अ.जा.ज.अ.प्र.कायदा अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# तब्बल २० वर्षापासून रक्तदानाचा महायज्ञ अविरत सुरु; यावर्षी शिबिरात १०० जणांनी केले रक्तदान

**धाराशिव/प्रतिनिधी:** आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष सुनील काळे सामाजिक बांधिलकीतून मागील २० वर्षापासून दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित करतात. यावर्षी देखील शनिवारी (दि. ६) आयोजित करण्यात आलेल्या शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला. दिवसभरात एकूण १०० जणांनी रक्तदान केले. विशेष म्हणजे आदिवासी विकास प्रकल्पाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देखील या शिबिरात उत्स्फूर्त सहभाग घेतला सुनील काळे हे सामाजिक क्षेत्रातील सुपरिचित व्यक्तिमत्व आहेत. विविध सण, उत्सव तसेच महापुरुषांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक उपक्रम राबविण्याचे कार्य ते सातत्याने करीत आहेत. शासनाच्या योजनांपासून वंचित असलेल्या आदिवासी पारधी समाजाला आधारकार्ड, रेशन कार्ड, जमिनीचे दाखले, बँक खाते, कर्ज योजना मिळवून देण्यासाठी त्यांनी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे आज अनेक कुटुंबांना मोठा आधार मिळाला असून बेरोजगारांच्या हाताला काम मिळाले आहे. आदिवासी पारधी समाजाला शबरी आवास योजनेतून पक्की घरे उपलब्ध करून त्यांना हक्काचे घरकुल मिळवून दिले आहे. गतवर्षी कन्येच्या लग्नात सुद्धा त्यांनी घेतलेल्या शिबिरात ५१ जणांनी रक्तदान केले होते. मागील २० वर्षापासून ते वाढदिवसावर कोणताही वायफळ खर्च न करता रक्तदान शिबिराचे आयोजन करतात. कोरोना काळात दोन वर्षे रक्तदानाचा हा महायज्ञ खंडित होता. यावर्षीही त्यांनी शासकीय रक्तपेढीत रक्तदान शिबिराचे आयोजन केले. त्यांच्या आवाहनास प्रतिसाद देत शेकडो युवकांनी शिबिरात सहभागी होऊन उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. यावेळी आदिवासी विकास प्रकल्प सोलापूर विभागाचे प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे, डीवायएसपी मोतीचंद राठोड, सोलापूर जिल्हाध्यक्ष अनिल चव्हाण, नगरसेवक बापू पवार, सामाजिक कार्यकर्ते दत्ता काळे, संजू पवार, दादा काळे, पंकज काळे आदी उपस्थित होते.

शासकीय रक्तपेढीतील प्रभारी अधिष्ठाता डॉ. स्वाती पांढरे डॉ. विवेक कोळगे, डॉ. सतीश तांदळे डॉ. दीपमाला करंडे, डॉ. विशाल नारायणकर, रक्तपेढी तंत्रज्ञ इंद्रजित साळवे, विठ्ठल कांबळे, अविनाश रणखांब, निलाक्षी जानराव, शिवकुमार जगताप, जनसंपर्क अधिकारी तिरुपती केंद्रे यांनी रक्त संकलन केले.

# एसटी महामंडळाने प्रवाशांच्या समस्या सोडविण्यावर भर द्यावा- उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार



**बारामती/वृत्तसेवा:** बारामती आगारात नव्याने दाखल दहा 'राजमाता जिजाऊ' या अत्याधुनिक स्मार्ट बससेवेचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती तालुक्यातील पायाभूत सुविधा विकासाला नेहमीच प्राधान्य दिले. त्यापैकीच एक आणि देशात मॉडेल बनलेल्या बारामती बसस्थानकाचा परिसर, बसमधील स्वच्छता राखणे, बस वेळेवर सोडण्यासह प्रवाशांची सुरक्षितता आणि त्यांच्या समस्या सोडविण्यावर राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) भर द्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी दिले.

'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान २०२५' मध्ये अव्वल स्थान पटकावल्याबद्दल बारामती बसस्थानक येथे आयोजित एसटी महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अभिनंदन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, बारामती 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, एसटी महामंडळाचे पुणे विभाग नियंत्रक अरुण सिया, गट विकास अधिकारी किशोर माने, न.प. मुख्याधिकारी पंकज भुसे, विभागीय कामगार अधिकारी सचिन भुजबळ, आगार व्यवस्थापक प्रविण शिंदे, माजी सहाय्यक वाहतूक अधिक्षक घनश्याम सदाशिव शिंदे यांच्यासह महामंडळाचे कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# मोटरसायकल चोर स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

**धाराशिव/प्रतिनिधी:** दि.०४.०६.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने हे माला विषयी गुन्ह्यातील आरोपींची माहिती घेत सरकारी वाहनाने पेट्रोलिंग करीत पोलीस ठाणे धाराशिव शहर हद्दीत आले असता पथकास माहिती मिळाली की, एक इसम चोरीची मोटारसायकल ताब्यात बाळगुन आहे व तो आठवडी बाजार जवळ, धाराशिव येथे थांबलेला आहे अशी खात्रीशीर माहिती मिळालेवरुन पथकान नमदु ठिकाणी जावून बातमी मधील इसमास ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्यानी त्यांची नाव- अशिष उर्फ संतोष असे सांगितले. पथकाने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल बाबत विचारपुस करता त्याने सदरची मोटरसायकल ही चार महिन्या पुर्वी समर्थनगर धाराशिव येथुन चोरी केल्याचे सांगितल्याने. नमुद व्यक्तीस ताब्यात घेवून त्याचे कडून अंदाजे २०,००० किंमतीची मोटरसायकल जप्त केली. सदर व्यक्तीने चोरीच्या नमूद मोटारसाकलसह पुढील कारवाईस्तव आनंदनगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशावरुन सपोनि अमोल मोरे, पोहेकॉ/ बळीराम शिंदे, अमोल चव्हाण, राहुल नाईकवाडी, मपोह/ शोभा बांगर चालक पोलीस अमंलदार- दहीहंडे यांच्या पथकाने केली आहे.

# चालक-वाहकांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक; प्रवाशाचा हरवलेला मोबाईल सुखरूप परत

**कळंब/प्रतिनिधी:** आजच्या काळात हरवलेली वस्तू परत मिळणे दुर्मिळ मानले जाते. मात्र, कळंब आगारातील चालक आणि वाहक यांनी आपल्या प्रामाणिकपणाचा आदर्श घालून देत प्रवाशाचा हरवलेला मोबाईल सुखरूप परत करून कौतुकास्पद कार्य केले.

धाराशिव ते कळंब मुक्कामी बसची सेवा बजावत असताना कळंब आगाराचे वाहक एम. व्ही. काटे आणि चालक एस. एस. गिरी यांना बसमध्ये एक मोबाईल फोन आढळून आला. चौकशीअंती हा मोबाईल श्रीमती छाया अशोक गवाड (रा. हळदगाव, ता. कळंब) यांचा असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर चालक-वाहकांनी जबाबदारीची जाणीव ठेवत संबंधित प्रवाशाची ओळख पटवली आणि आगार प्रमुख विजयकुमार घोलप यांच्या कक्षात मोबाईल मालकास सुपूर्द केला. हरवलेला मोबाईल परत मिळाल्याने श्रीमती गवाड यांनी चालक-वाहकांचे मनापासून आभार मानले.

यावेळी सुरक्षा रक्षक पी. व्ही. वाघमारे यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

चालक एस. एस. गिरी आणि वाहक एम. व्ही. काटे यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणा व कर्तव्यदक्षतेचे प्रवासी व नागरिकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या या कृतीमुळे महामंडळाची विश्वासार्हता अधिक दृढ झाली असून, प्रवासी सेवा हीच आमची सेवा या ब्रीदवाक्याची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे.

# तुळजापूर परिसरात पोलीस उप अधीक्षकांच्या पथकाची दोन मटका अड्डे आणि दोन अवैध ताडी केंद्रांवर छापेमारी

**तुळजापूर/प्रतिनिधी:** धाराशीव जिल्ह्यामध्ये अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. पोलीस अधीक्षक श्रीमती रीतु खोखर आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज, दिनांक ०४ जून २०२६ रोजी तुळजापूर येथे अवैधरित्या चालणाऱ्या २ मटका अड्ड्यांवर, २ अवैध ताडी विक्री केंद्रांवर आणि १ कोपटा COTPA कायद्यांतर्गत अशा एकूण ५ ठिकाणी एकाच वेळी धडक छापेमारी करण्यात आली. माहितीच्या आधारे धाड परि.पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांना मिळालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीच्या आधारे ही योजनाबद्ध कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत अमोल मोहिते यांच्यासह सहायक पोलीस निरीक्षक सुरेश कासुळे , सहायक पोलीस निरीक्षक प्रविण सोमवंशी, पोलीस उपनिरीक्षक (PSI) रामचंद्र बहुरे, तसेच क्युआरटी (QRT) पथक, आरसीपी (RCP) पथकातील पोलीस अंमलदार आणि चालकांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

**१४ संशयित ताब्यात; ५ गुन्हे दाखल**

या धडक कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून एकूण १४ संशयितांना रंगेहात ताब्यात घेतले आहे, तर २ संशयित आरोपी फरार झाले आहेत. याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात एकूण ५ गुन्हे दाखल करण्यात आले असून, संबंधित इसमांवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ चे कलम १२ (अ) आणि महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, कलम ६५-इ व ८४ तसेच कोपटा (COTPA) क्टनुसार गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. या कारवाईदरम्यान घटनास्थळावरून जप्त करण्यात आलेली एकूण अंदाजे १३० लीटर अवैध ताडी पोलिसांनी नष्ट केली आहे. फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत. धाराशिव जिल्ह्यात कोणत्याही प्रकाराचे अवैध धंदे, जुगार किंवा अवैध दारू-ताडी विक्री खपवून घेतली जाणार नाही. जिल्ह्यात कुठेही अवैध व्यवसाय सुरू असल्याचे आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध यापुढेही अशीच अत्यंत कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पोलीस प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

# पर्यावरण दिन व जागतिक सायकल दिनानिमित्त विद्यार्थ्यांचा गौरव

**धाराशिव/ प्रतिनिधी:** पर्यावरण संवर्धन आणि सायकल वापराबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब धाराशिवच्या वतीने पर्यावरण दिन व जागतिक सायकल दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ग्रामीण भागातील दोन शाळांमधील वर्षभर नियमित सायकलने शाळेत ये-जा करणाऱ्या ६० विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

रोटरी क्लब धाराशिवने पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी राबविलेल्या या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी वर्षभरात एकूण १ लाख ३१ हजार किलोमीटर इतका सायकल प्रवास केला. या प्रवासामुळे पर्यावरणासह आर्थिकदृष्ट्याही मोठा फायदा झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले.

उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या गणनेनुसार, सरासरी १५ किमी प्रतिलिटर मायलेज देणाऱ्या पेट्रोल कारच्या तुलनेत विद्यार्थ्यांच्या सायकल प्रवासामुळे सुमारे ८ हजार ७३३ लिटर पेट्रोलची बचत झाली. आजच्या पेट्रोलच्या सरासरी १०० रुपये प्रतिलिटर दरानुसार ही बचत जवळपास ८ लाख ७३ हजार रुपयांपर्यंत पोहोचते. तसेच या सायकल प्रवासामुळे सुमारे २० हजार १७० किलो म्हणजेच २०.२ टन कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन टळले. पर्यावरण तज्ज्ञांच्या माहितीनुसार, एका झाडाकडून वर्षभरात सरासरी २० किलो कार्बन डायऑक्साइड शोषला जातो. त्या तुलनेत विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नामुळे सुमारे १,००० झाडे लावल्याएवढा पर्यावरणीय लाभ झाल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित शाळांच्या मुख्याध्यापकांनी रोटरी क्लब धाराशिवच्या या अनोख्या व समाजोपयोगी प्रकल्पाचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये सायकल वापराची सवय रुजविण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सायकलने प्रवास करण्याकडे ओढा वाढेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष रणजीत रणदिवे, सचिव प्रदीपजी खामकर, अमोल माने, चित्रसेन राजेनिंबाळकर आणि चंदन भडांगे उपस्थित होते. या अभिनव उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कळंब येथील प्रवेशासाठी अर्ज करा : प्राचार्यांचे आवाहन

**धाराशिव (जिमाका):** कळंब येथील संतश्रेष्ठ गोरोबा काका शासकीय 'आयटीआय' साठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया २१ मे पासून सुरू झाली असून, पहिल्या फेरीसाठी प्राधान्यक्रम सादर करण्याची प्रक्रिया १ जूनला उपलब्ध करून दिली आहे.संतश्रेष्ठ गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत एकूण ०९ व्यवसायासाठी २५६ जागा उपलब्ध आहेत.यामध्ये अभियांत्रिकी गटात इलेक्ट्रिशीयन,वायरमन,फिटर, मोटार मेकॅनिक,ट्रॅक्टर मेकॅनिक, सर्व्हेअर,वेल्डर तर बिगर अभियांत्रिकी गटात ड्रेसमेकिंग, कोपा हे व्यवसाय उपलब्ध आहेत.

संतश्रेष्ठ गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी २१ मे पासून निःशुल्क मार्गदर्शन संस्थेत आयोजित करण्यात आले आहे.

**प्रवेश प्रक्रियेचा तपशील : कालावधी**

ऑनलाइन प्रवेश अर्ज करणे, अर्जात दुरुस्ती करणे,प्रवेश अर्ज शुल्क जमा करणे : २१ मे पासून.

प्रवेश अर्ज निश्चित करणे,अर्ज स्वीकृती केंद्रात मूळ कागदपत्रांच्या तपासणीनंतर प्रवेश अर्ज निश्चित करणे : २१ मे पासून.

पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्था निहाय विकल्प आणि प्राधान्य सादर करणे : १ जूनपासून.

संतश्रेष्ठ गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कळंब मधील संलग्न व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यांची यादी "https://admission.dvet.gov.in'या संकेतस्थळावर उपलब्ध असून, प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील संकेतस्थळावर जाऊन प्रवेश नोंदणी करावी,असे आवाहन संस्थेचे प्राचार्य केशव पवार यांनी केले आहे.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**TWR काम**

विभागातील डीआरएम मध्य रेल्वेच्या सोलापूर आणि मा. भारतच्या राष्ट्रपतींच्या वतीने प्रतिष्ठित कंपन्या/ कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ई-निविदा मागवत आहेत: **ई-निविदा सूचना क्र.: 02-2026-DEN-Tr**; **कामाचे नाव:** -. **A.** सोलापूर विभागातील ADEN/LUR उप-विभागांतर्गत KWV-SEI ब्लॉक सेक्शनमध्ये किमी ३८४.० ते किमी ३९०.६ दरम्यान TWR चे काम; **B.** सोलापूर विभागातील ADEN/LUR उप-विभागांतर्गत KWV-SEI ब्लॉक सेक्शनमध्ये किमी ३९३.० ते किमी ३९९.६ दरम्यान TWR चे काम. (पुन्हा निमंत्रण); **कामाचा अंदाजित खर्च:** रु. २,७८,४३,०१५.४९; **अनामत रक्कम:** रु. ५,५६,९००/-; **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने; **देखभाल कालावधी:** नाही; **निविदा अर्जाची किंमत:** नाही; **www.ireps.gov.in** या **संकेतस्थळावर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:** २९.०६.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत; **www.ireps.gov.in** वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** २९.०६.२०२६ रोजी १५:३० नंतर; **संकेतस्थळाचा तपशील: www.ireps.gov.in**; **टीप:** इच्छुक निविदाकारांना सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी, जेणेकरून या निविदेबाबत जारी केलेले कोणतेही बदल किंवा शुद्धिपत्रक त्यांच्या निदर्शनास येईल.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक काम**
**DE/Sur-32** **मध्य रेल्वे, सोलापूर**

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.



**Name of Change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **PATEL NILOFAR ABDULNAKHEE**
TO: **SAYYED NILAM MOHSIN JAHAGIRDAR**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **SAYYED NILAM MOHSIN JAHAGIRDAR** in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **PATEL NILOFAR ABDULNAKHEE**
NEW NAME :-. **SAYYED NILAM MOHSIN JAHAGIRDAR**
Address - Inamadar Gall Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar No. 925179415577
Mob.No. 8975758244

**Name of Change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **MD ISMAIL MD FASIODDIN KAZI**
TO: **MOHAMED ISMAIL MOHAMED FASIODDIN KAZI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **MOHAMED ISMAIL MOHAMED FASIODDIN KAZI** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **MD ISMAIL MD FASIODDIN KAZI**
NEW NAME :- **MOHAMED ISMAIL MOHAMED FASIODDIN KAZI**
Address - Kazi Galli Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar No.-672950608026
Mob. No. 8446594547



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर धाराशिव (उस्मानाबाद) येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,DHARASHIV(Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649